

# आविष्कार

२०२४-२५

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

सहकार महर्षी स्व.भास्करराव शिंगणे
कला महाविद्यालय, खामगांव

CGPA 3.32

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नीत

# सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, खामगांव जि. बुलडाणा

।। प्रेरणास्थान ।।



सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे

।। मार्गदर्शक ।।



माजी मंत्री मा.डॉ. राजेंद्रजी शिंगणे

# राष्ट्रीय परिषद अहवाल

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगाव, राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद नागपूर विदर्भ प्रांत व ग.भि. मुरारका महाविद्यालय शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय आंतरविद्या शाखीय राष्ट्रीय परिषद दि.23 फेब्रुवारी 2025 रोजी सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे महाविद्यालय, खामगाव येथे संपन्न झाली. या परिषदेत महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 या विषयावर मंथन झाले उद्घाटन क्षेत्राचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. सद्‌गुणराव  देशमुख सर उद्घाटक म्हणून संजय तिवारी नागपूर तसेच शेगाव शिक्षण संस्थेचे संचालक रवीशेठ मुरारका परिषदेच्या अध्यक्ष डॉ. अलका देशमुख इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी बीजभाषक राजकीय विश्लेषक डॉ. नितीन निर्मल, पुणे यांनी 2024 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे विश्लेषण केले. दरम्यान मुरारका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनोद इंगळे उपस्थित होते. अक्षर प्रकाशन जळगाव खानदेश द्वारा प्रकाशित प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांचे 104 शोधनिबंध असलेल्या जर्नलच्या दोन अंकांचे पुस्तक प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. पहिल्या सेवानिवृत्त सत्राचे अध्यक्ष डॉ. रतन राठोड , अकोला होते तर सेवानिवृत्त अधिष्ठाता डॉ. रूपेंद्र मोदी बिहार, डॉ. प्रतिभा टावरी, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ मुंबई विद्यापीठ अध्यक्ष डॉ. अमृता देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक प्रा. संदीप तुंडूरवार नागपूर यांनी ऐतिहासिक संदर्भ देऊन राजकीय नैतिकतेवर प्रकाश टाकला. त्यानंतर दुसऱ्या सत्रात वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची पॅनल चर्चा संपन्न झाली. या सत्राचे अध्यक्ष डॉ. राहुल बावगे नागपूर हे होते.

तिसऱ्या सत्रात प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादरीकरण केले. या परिषदेचे समन्वयक प्रा. गोपालकृष्ण राखोंडे, खामगाव व प्रा. डॉ. विनोद गायकवाड, शेगाव यांनी जबाबदारी सांभाळली. परिषदेच्या यशस्वीतेकरिता शिंगणे महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले या परिषदेकरिता महाराष्ट्रासह देशाच्या अन्य राज्यातूनही प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संयोजक

**प्रा. गोपालकृष्ण श्री. राखोंडे**

**राज्यशास्त्र विभाग प्रमुख**

**संयोजक महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024**

# राष्ट्रीय छात्र सेना अहवाल

राष्ट्रीय छात्र सेना ही भारतातील देशांतर्गत असुरक्षित प्रसंगी नागरी संरक्षण सेवेसाठी मुलाचे कार्य करणारी छात्र संघटना आहे 20 नोव्हेंबर 1948 ला विशेष कायदा मंजूर करून एन.सी.सी ची स्थापना करण्यात आली विद्यार्थ्यांमध्ये सैन्याविषयीची आवड निर्माण करणे देशाप्रती प्रेम व साहसी युवक तयार करणे हा या संघटनेचा उद्देश आहे. महाविद्यालयामध्ये 2012 - 13 पासून 30 छात्रांचे युनिट सुरु करण्यात आले. सध्या परिस्थितीत 36 छात्रांची युनिट आहे. त्यामध्ये 17 एस. डी. व 22 एस डब्ल्यू आहेत एन. सी. सी. विभागाकडून सी. ए. टी. सी. व टी. एस. सी. चे कॅम्प मध्ये विद्यार्थी उत्स्फूर्तपणे भाग घेतात. तसेच मालवणकर फायरिंग मध्ये महाविद्यालयातील चेतन कळसकर याने उत्तम कामगिरी बजावून महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. सध्या परिस्थितीमध्ये महाविद्यालयातील एन.सी.सी. चे विद्यार्थी अप्सराकल ट्रेनिंग व फायरिंग मध्ये उत्तम कामगिरी बजावून मेडल सुद्धा मिळवले. महाविद्यालयातील एन.सी.सी.चा क्याडेट चिंतामण भिसे हा अग्निवीरसाठी सिलेक्ट झाला आहे. एन.सी.सी. विभागातर्फे बरेचसे उपक्रम राबवण्यात आले आहे जसे की स्वच्छता मोहिम गावातील जनुना तलाव येथील साफसफाईचे काम व वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबविण्यात येतात.

**दीप्ती सारंग कुलकर्णी**
**एन.सी.सी. विभाग प्रमुख**

# Report of Vocational Department 2024-25

The students of BVoc underwent internship at Jaideep Motors and Manraj Motors, Khamgaon 14 to 28 Feb 2025. Students also benefitted from training at the Central government institute, Central Farm Machinery Training and Testing Institute, Budhni, MP . They attended the course: "Repair and Overhauling of Stationery Engine and Tractor" from 27 Jan to 7 March 2025.

Students of final year made innovative projects like Grass Cutter Machine and Electric Vehicle as part of their curriculum under the guidance of their teachers.

A workshop on Entrepreneurship Development was organised by the NEP Cell to give students exposure to and information about various government schemes and ways to overcome challenges faced by entrepreneurs. The workshop was organised in collaboration with District Centre for Skill Development. Mr. Sunil Patil gave information about the schemes run by the district centre for budding entrepreneurs. Mr. Sunil Gore alumnus of the college and head of a successful venture, inspired students by recounting his experiences. Mr. Alim Syed, Manager, Manraj Motors spoke to students about opportunities in the auto sector.

**Dr.Nilima Deshmukh**

**Nodal Officer (B.Voc)**

# सांस्कृतिक विभाग अहवाल

सांस्कृतिक विभाग दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मोठ्या प्रमाणात वाव देते. शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यासक्रम शिकवण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे हे देखील महत्त्वाचे असते. दरवर्षी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन आणि युवा महोत्सव यासारखे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

सांस्कृतिक विभागातर्फे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारे घेण्यात येणाऱ्या युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी होतात. यावर्षी अकोला येथील खंडेलवाल महाविद्यालयामध्ये पार पडलेला युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मुकनाट्य हा कला प्रकार सादर केला. दि. 12-10-2024 रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. 23-8-2024 रोजी 'प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज' हा कार्यक्रम सांस्कृतिक विभागाच्या अंतर्गत घेण्यात आला, याचबरोबर दि. 12-03-2025 रोजी पदवी वितरण कार्यक्रम घेण्यात आला.

**प्रा डॉ. दयानंद राऊत**
**सांस्कृतिक विभाग**

भिजविण्यात आले आणि मैदानावरील गाजर गवत निर्मूलन करण्यात आले.

वृक्षरोपण व वितरण - राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात दि.18-08-2024 ला 'एक पेड मा के नाम' अभियान राबविले. यामध्ये स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या आवारात तसेच घराच्या परसबागेत आईच्या नावाने एक वृक्ष लावण्यात आला. त्याकरिता महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप करण्यात आले.

शिक्षक दिन दि.05-09-2024 ला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या निमित्त शहरातील प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, शाखा खामगावच्या ब्रह्मकुमारी सुषमा दिदी यांनी विद्यार्थ्यांना तणावमुक्ती आणि जीवनात शिक्षकांचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर महाविद्यालयात स्वयंशासन राबविण्यात आले.

स्वच्छता अभियान - राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात दि.15 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर दरम्यान स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला. यामध्ये स्वच्छते विषयी व्याख्यान श्रमदान जनजागृती असे अनेक उपक्रम राबविण्यात आले.

महापरिनिर्वाण दिन - दि.06-12-2024 ला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन त्यांच्या जीवन कार्यावर प्राचार्यांनी प्रकाश टाकला.

सावित्रीबाई फुले जयंती - दि.03-01-2024 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख वक्त्या प्रा.अनिता सातव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

रस्ता सुरक्षा सप्ताह - दि.27-01-2025 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले. नागपूरच्या 'जन आक्रोश फॉर बेटर टुमारो' या स्वयंसेवी संस्थेच्या चमुने विद्यार्थ्यांना रस्ते अपघात व ते टाळण्याचे उपाय यावर दृकश्राव्य माध्यमातून मार्गदर्शन केले.

**संयोजक** **संयोजक**

**प्रा.गोपाल राखोंडे** **प्रा.डॉ. हर्षा ढाले**

**राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०२४ - २५

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना चे युनिट 100 स्वयंसेवकांचे आहे. दरवर्षी रा.से.यो. तर्फे विद्यार्थी विकास व समाजहित लक्षात ठेवून अनेक उपक्रम राबविण्यात येतात. सत्र 2024 - 25 मध्ये महाविद्यालयाच्या रा.से.यो. पथकाद्वारे पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

जागतिक योग दिन ,- 21-06-2024 ला महाविद्यालयात रासेयो व क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन साजरा करण्यात आला योग गुरु प्रा.मुलांडे यांनी सहभागी स्वयंसेवक व कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण दिले.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन - दि.08-08-2024 ला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व स्पर्धा परीक्षा सेलच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग घेण्यात आला. साई अकॅडमी खामगावचे प्रा. श्रीकांत बेलसरे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्लास्टिक मुक्ती अभियान 11-08-2024 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संत गजानन महाराज पालखी मार्गावर प्लास्टिक मुक्ती अभियान राबविण्यात आले. पालखीतील भाविक व अन्य व्यक्तीद्वारे चहा नाशत्याचे कप व प्लेटा मार्गावर गोळा करण्यात आल्या.

नव मतदार नोंदणी - महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नव मतदार नोंदणी व मतदार यादी दुरुस्ती कार्यक्रम राबविण्यात आला. ज्याचे वय सप्टेंबर 2024 रोजी 18 वर्षे पूर्ण झाले आहे अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना आवश्यक पुराव्यासह नमुना 6 भरून घेणे अथवा ऑनलाईन वेबसाईटच्या माध्यमातून मतदार म्हणून नोंदणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

हर घर तिरंगा अभियान - राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.9 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येक स्वयंसेवकाने आपल्या घरावर आणि दि.13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट पर्यंत महाविद्यालयात तिरंगा झेंडा फडकविण्यात आला.

श्रमदान- दि. 14 ऑगस्ट 2024 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरामधे श्रमदान केले. महाविद्यालयाच्या आवारातील खड्डे पावसाच्या पाण्यामुळे जमिनीला पडलेले चर मुरुम टाकून

विद्यार्थ्यांना पोषण विषय जागृती निर्माण व्हावी याकरिता दि. 20-9-2024 रोजी गृहअर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक जीवनशैली आणि संतुलित आहार व पोषणाची गरज या विषयावर मार्गदर्शन तसेच गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील हे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पंचशील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे व रुग्णालयाचे डॉ. निशांत मुखिया आणि समुदाय औषध विभाग सहाय्यक प्रा. डॉ. माधुरी वानखडे या होत्या. त्यांनी पी.पी.टी. प्रेझेंटेशन द्वारे आहार विषयक मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे डॉ. निशांत मुखिया यांनी गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारिणी घोषित करून अभ्यास मंडळाची स्थापन केली.

खामगाव येथे पारीजा स्पोर्ट क्लबच्या वतीने आयोजित फ्लावर कॉम्पिटिशन आणि इनडोअर प्लांट प्रदर्शनीला भेट देण्यात आली. या प्रदर्शनीत बी.ए. भाग 1 / 2/ 3 च्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. त्यामध्ये विविध प्रकारची फ्लावर, इंडोर प्लांट, बर्ड फोटो आदी गोष्टीचा विद्यार्थिनींनी आस्वाद घेतला.

## गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | अर्चना महादेव शेंडगे | बी.ए. भाग 3 |
| उपाध्यक्ष | अश्विनी सोळंके | बी.ए. भाग 3 |
| सचिव | काजल राम क्षिरसागर | बी.ए. भाग 2 |
| सदस्य | सलोनी रमेश सदार | बी.ए. भाग 2 |
| सदस्य | स्विटी संतोष बोचरे | बी.ए. भाग 1 |
| सदस्य | वैष्णवी सतीश क्षिरसागर | बी.ए. भाग 1 |
| सदस्य | अनुष्का विनोद सुशीर | बी.ए. भाग 1 |

**प्रा.डॉ. मालती सातव**

**गृहअर्थशास्त्र विभाग**

# गृह अर्थशास्त्र अहवाल

गृहअर्थशास्त्र हे जीवन शिक्षण आहे. कारण यामध्ये गृहिणींच्या गृह जीवनाशी निगडित सर्व समस्यांचे अध्ययन केले जाते. गृहअर्थशास्त्राच्या गाभाऱ्यामध्ये गृहव्यवस्थापनाचा समावेश आहे. यामध्ये स्वयंपाका सोबतच घरगुती व्यवस्थापनाचे सर्व पैलू शालेय वातावरण शिकविले जातात. यामध्ये मानवी विकास गृहनिर्माण आणि अंतर्गत रचना अन्न व पोषणशास्त्र वैयक्तिक आणि कौटुंबिक वित्त वस्त्रशास्त्र उपभोक्ता आणि ग्राहक समस्या कार्यक्रम व्यवस्थापन असे विषय समाविष्ट आहेत.

गृह अर्थशास्त्राचे शिक्षण पूर्वी वैयक्तिक आणि कौटुंबिक समस्या भोवती केंद्रित असायचे परंतु आता ते जास्त लोकसंख्या शहरी दारिद्र्य आणि अनेक आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे मुद्द्यांकडे वळत आहे. गृहअर्थशास्त्र हे एकेकाळी फक्त महिलांच्या कामाचे शिक्षण म्हणून पाहिले जात होते. परंतु आता हे मुलांना अनेक मनोरंजक करियर मार्गासाठी सज्ज करते. गृहअर्थशास्त्र विषयाचे शिक्षण घेऊन विद्यार्थी पोषण आहारातज्ञ, वैद्यकीय व्यावसायिक व्याख्याते, अन्न तंत्रज्ञ, अन्न लेखक, आरोग्य व्यवसायि, अन्न उत्पादक, विकासक, स्वयंपाकी, क्रीडा पोषणतज्ञ सोबतच इतरही व्यवसायात करिअर सुरु करु शकतात म्हणून हा विषय एक महत्त्वपूर्ण असून अनेक मौल्यवान जीवन कौशल्य शिकवितो.

या विषयाअंतर्गत महाविद्यालयामध्ये दि. 8 ऑगस्ट 2024 रोजी माता व बालकांच्या दृष्टिकोनातून स्तनपानाचे महत्त्व या विषयावर पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. तर प्रमुख पाहुणे डॉ. निलीमा देशमुख ह्या होत्या. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती डॉ. हर्षा ढाले यांची होती. सदर पोस्टर स्पर्धेमध्ये बी.ए. भाग I,II,III च्या वर्गातील मुलांचे क्रमांक काढण्यात आले व क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसाचे वितरणही करण्यात आले.

दि. 13 सप्टेंबर 2024 रोजी पोषण आणि गणपती उत्सवानिमित्त मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रचार्य.डॉ. संजय पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. निलीमा देशमुख होत्या. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती महाविद्यालयातील डॉ. विश्वकर्मा, प्रा. राखोंडे , डॉ.हर्षा ढाले यांची होती. या स्पर्धेत विद्यार्थिनींनी पुरणाचे, बिस्किटाचे, उकडीचे, चॉकलेटचे, खोबरा असे नाविन्यपूर्ण मोदक बनविले. सदर स्पर्धेतून प्रथम क्रमांक सुहानी दीपक खंडेराव, द्वितीय क्रमांक बी.ए. II राजनंदिनी विलास डांगे, तृतीय क्रमांक बीए भाग III सपना देवराव गवांदे व सलोनी सदार बी.ए. भाग II या विद्यार्थिनींनी मिळविला कार्यक्रमाचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मालती सातव यांनी केले.

जर्नल्स त्याचप्रमाणे 55 कात्रणे प्रकल्प, 127 M.lib प्रकल्प उपलब्ध आहेत 25 बॅक व्हॅलूम सिलॅबस आणि अमरावती विद्यापीठाच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध आहेत.

ग्रंथालयाद्वारे काही सुविधा पुरविल्या जातात. यामध्ये संदर्भ सेवा, कात्रण प्रकल्प सेवा, इंटरनेट सेवा, पेपर सेट इत्यादी. ग्रंथालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केलेला आहे. यामध्ये ग्रंथालय संगनीकीकरणसाठी Lib. soft. आज्ञावलीचा उपयोग केलेला आहे. त्याचबरोबर Barcode System चा सुद्धा उपयोग केलेला आहे. जवळपास सर्व ग्रंथांना Barcode Sticker लावलेले आहेत व ग्रंथालयांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. ग्रंथालयामध्ये N- List Consortia उपलब्ध आहे. यामध्ये जवळपास दहा हजार + ई-बुक्स आहेत. आणि 6000 + E-Jurnals उपलब्ध आहेत. येणाऱ्या काळात ग्रंथालयामध्ये उत्तम प्रकारच्या सेवा व साहित्य उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

**संयोजक**
**डॉ. संदीप लांडे**
**श्री सचिन कोल्हे**
**ग्रंथालय विभाग**

# ग्रंथालय विभाग अहवाल

'वाचाल तर वाचाल' ही म्हण फार काळापासून ऐकत आलो आहोत. वाचनामुळे मनुष्याजवळ गुणवत्ता प्राप्त होते. जर मनुष्याजवळ गुणवत्ता असेल तर मनुष्य यशाचे शिखर नक्कीच पार करू शकतो आणि हे शिखर पार करण्यासाठी त्याला उत्कृष्ट अशा ग्रंथांची आवश्यकता असते आणि हे ग्रंथ एकत्रित मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे ग्रंथालय होय म्हणून आज ग्रंथालयांना ज्ञानाचे भंडार म्हटले जाते.

आपल्या परिसरातील समाजात ग्रंथालय शास्त्राचे शिक्षण मिळावे या दृष्टिकोनातून संस्थेचे सचिव डॉ. सद्गुणराव देशमुख यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाची सुरूवात सत्र 2007-2008 मध्ये B.Lib. & I.Sc. आणि M.Lib. & I.Sc. अभ्यासक्रमाची सुरुवात 2008 - 2009 मध्ये केली.

ग्रंथालय विभाग आणि ग्रंथालय शास्त्र विभाग यांच्या संयुक्ततेने 12-08- 2024 ला डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. सूत्रसंचालन डॉ. संदीप लांडे यांनी केले व प्रमुख उपस्थिती डॉ. वासनिक आणि डॉ. प्रमोद चव्हाण होते. त्याचप्रमाणे 25 नोव्हेंबर 2024 ला B.lib आणि M.lib., च्या विद्यार्थ्यांचे सेमिनार प्रेझेंटेशन घेण्यात आले.

त्याचप्रमाणे महाविद्यालयामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग अंतर्गत महाराष्ट्र शासनाचा 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अंतर्गत सामूहिक वाचन, वाचन संकल्प कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या अध्यक्षा डॉ. निलीमा देशमुख होत्या व प्रमुख वक्ते प्रा. हरिभाऊ वडोदे होते. सूत्रसंचालन अतुल सदानशिव यांनी केले व प्रास्ताविक डॉ. संदीप लांडे यांनी केले. त्याचबरोबर महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. तसेच 27-01- 2025 ला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाअंतर्गत B.lib & M.lib च्या विद्यार्थ्यांची श्री संत गजानन महाराज व अभियांत्रिकी महाविद्यालय ग्रंथालय येथे अभ्यासक्रमा संबंधीत भेट देण्यात आली.

यामध्ये ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे संपूर्ण विद्यार्थी उपस्थित होते. त्याचप्रमाणे ग्रंथालय आणि माहिती शास्त्र विभागाची विद्यार्थीनी हर्षा खंडागळे हिचा B.lib & I. Sc. या अभ्यासक्रमामध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये तिसरा क्रमांक आला.

ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सोयींयुक्त आहे. यामध्ये एकूण 6215 ग्रंथ 13 नियतकालीक व

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने प्रथम क्रमांक व सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला कनिष्ठ महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकाविला व इतर वैयक्तिक बक्षिसे सुद्धा या स्पर्धेत देण्यात आले.

सत्राच्या शेवटी सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनींची शारीरिक क्षमता चाचणी घेऊन त्यांना शारीरिक क्षमतेचे, व्यायामाचे महत्त्व पटवून देण्यात आले. महाविद्यालयातील मा. प्राचार्यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाची यशस्वीतेकडे वाटचाल सुरु आहे.

**प्रा. डॉ. गणेश विश्वकर्मा**
**संचालक,**
**क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग**

# क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग
# अहवाल 2024-25

खेळाडूंच्या क्रीडा गुणांना व नेतृत्व क्षमतेला चालना देण्यासाठी महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण विभाग सदैव प्रयत्नशील असतो. या विभागातर्फे विद्यापीठ स्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी व यश संपादनासाठी वेळोवेळी प्रोत्साहित केले जाते व त्यासाठी विभिन्न प्रकारचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात येते.

महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सत्र 2024 25 मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी (मुले), खो-खो (मुले), मैदानी खेळ, कबड्डी (मुली) क्रॉस कंट्री व तलवारबाजी इत्यादी स्पर्धेत भाग घेऊन दैदीप्यमान यश संपादन करून महाविद्यालयाच्या गौरववात अधिक भर घातली.

**महाविद्यालयाचे सुयश**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन तलवारबाजी या क्रीडा प्रकारात धवल साखरकर बी.ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांची सेबर या क्रीडा प्रकारात यश संपादन करून आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संघात राखीव खेळाडू म्हणून आपले स्थान निश्चित केले. ही स्पर्धा श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.

**आंतर महाविद्यालयीन कबड्डी मुले स्पर्धेचे आयोजन**

सत्र 2024 -25 या वर्षी शारीरिक शिक्षण विभागाद्वारे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा आयोजित आंतर महाविद्यालयीन कबड्डी (पुरुष) स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर करण्यात आले. या स्पर्धेत सुमारे 42 संघांनी सहभाग घेऊन गो.से. महाविद्यालय, खामगाव उपविजेता, तर कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल हा संघ विजेता ठरला.

**आंतर कनिष्ठ महाविद्यालयीन कबड्डी मुले स्पर्धेचे आयोजन**

सन 2024-25 मध्ये शारीरिक शिक्षण विभागाद्वारे खामगाव तालुक्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय व स्थानिक आय.टी.आय. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना चालना देण्याच्या दृष्टीने आंतर कनिष्ठ महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले. या स्पर्धेत स्थानिक

समाजशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | अर्चना महादेव शेंडगे | बी.ए. भाग 3 |
| उपाध्यक्ष | राजनंदिनी विकास डांगे | बी.ए. भाग 3 |
| सचिव | मारोती गजानन महाले | बी.ए. भाग 3 |
| सदस्य | भावना सिद्धार्थ जाधव | बी.ए. भाग 2 |
| सदस्य | कोमल खंडेराव | बी. ए. भाग 1 |
| सदस्य | श्रेया मच्छिंद्र चौधरी | बी.ए. भाग 2 |
| सदस्य | काजल राम क्षिरसागर | बी.ए. भाग 2 |

**संयोजक**

**डॉ.दयानंद उत्तमराव राऊत**

**M.A.,M Phil,Ph.D, NET**

**समाजशास्त्र विभाग प्रमुख**

# समाजशास्त्र विभाग अहवाल

समाजशास्त्र विषय शैक्षणिक दृष्टिकोनातून जेवढा महत्त्वाचा आहे तेवढा सामाजिक दृष्टिकोनातून देखील महत्त्वाचा आहे. देश पातळीवर या विषयाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. बऱ्याच वेळा नीती आयोगाला समाजशास्त्र या विषयाचा आधार घ्यावा लागतो. या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थी सामाजिक मूल्ये, प्रमाणके नीतीमत्ता शिकतात, समाज समूह, दर्जाभूमिका, सामाजिकीकरण, सांस्कृतिक, सामाजिक अनुकरण आणि विचलन याविषयी विद्यार्थ्यांना ज्ञान मिळते व ते देशाच्या विकासात योगदान द्यायला सुरुवात करतात. याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी सेमिनार, चर्चासत्र, कार्यशाळा, प्रश्नमंजुषा युट्यूब व्हिडिओ दाखवून यांच्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.

दि.24-03-2025 रोजी बी.ए. भाग 1 च्या विद्यार्थ्यांसाठी सेमिनार घेण्यात आला सेमिनारचा विषय 'सामाजिक दर्जा' आणि भूमिका होता.

दि.27-3-2025 रोजी बी.ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांचा सेमिनार घेण्यात आला सेमिनारचा विषय हा 'भारतातील पांढरपेशी गुन्हेगारी' हा होता.

दि.04-04-2025 रोजी बी.ए. भाग 3 च्या विद्यार्थ्यांसाठी सेमिनार घेण्यात आला. सेमिनारचा विषय 'आदिवासी सामाजातील युवागृह' हा होता.

याबरोबरच सतत युज ऑफ आय. सी टी. चा वापर करून विद्यार्थ्यांना शिकविले जाते. दि. 25-07-2024 रोजी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे व्हिडिओ दाखवण्यात आले.

दि. 6-8-2024 रोजी विभागाच्या वतीने रोजगार विषयक कार्यशाळा घेण्यात आली.

दि.13-12-2024 आणि 14-12-2024 रोजी खामगाव तालुक्यातील शाळांमध्ये जाऊन सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली. NEP च्या विद्यार्थ्यांना क्रेडिट मिळविण्याच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येते.

आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून पूजन करण्यात आले.

दि. 27-01- 2025 ला विभागाच्या वतीने "रस्ता सुरक्षा अभियान" राबविण्यात आले यानिमित्त 'जन आक्रोश' नागपूर या स्वयंसेवी संस्थेच्या चमु ने विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे धडे विविध चित्राफितीच्या माध्यमातून दिले.

राज्यशास्त्र अभ्यास मंडळ कार्यकारिणी

| | |
|---|---|
| रोहित शिरसाट | अध्यक्ष |
| सलोनी सदार | उपाध्यक्ष |
| स्विटी बोचरे | सचिव |
| प्रथम इंगोले | सदस्य |
| गौरी झरेकर | सदस्य |
| सुहानी वानखडे | सदस्य |
| नेहा नेमाने | सदस्य |

**संयोजक**
**प्रा. जी.एस. राखोंडे**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख**

# राज्यशास्त्र विभाग अहवाल

मानवी जीवनाच्या राजकीय वर्तुळाला स्पर्श करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एक आदर्श, सुजाण नागरिक बनविणे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने महाविद्यालयात राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात येते. सत्र 2024-25 मध्ये या विभागाच्या वतीने पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

दि. 12-08-2019 ला राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्लास्टिक कचरा निर्मूलनासाठी प्लास्टिक वेचने कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. 13- 08-2024 ला विभागाच्या वतीने महाविद्यालयात श्रमदान उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आवारातील कचरा बुजवुन झाडांच्या आळ्यात माती टाकण्यात आली.

दि. 14-08-2024 विभागाच्या वतीने गाजर गवत निर्मूलन कार्यक्रम व हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. 26/8/2024 रोजी विभागाच्या वतीने वृक्षारोपन व वितरण कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'एक पेड मा के नाम' अभियान राबविण्यात आला. अभियानांतर्गत विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसर आणि आपापल्या घराच्या परिसरात एक झाड आईच्या नावाने लावून त्याचे संगोपन करण्याचे वचन घेण्यात आले.

दि. 05/09/2024 ला महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वयंशासन राबवून त्या दिवशी महाविद्यालयाचे संपूर्ण व्यवस्थापन सांभाळले आणि 'जीवनात शिक्षकाचे' महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

दि. 02-10-2024 ला राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली यानिमित्त महात्मा गांधींच्या जीवनावर प्रा. डॉ. मनोहर वासनिक यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

दि. 06-12-2024 ला विभागाचे वतीने महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला या निमित्त डॉ. बाबासाहेब

# इतिहास विभाग अहवाल

इतिहास विभागाद्वारे दरवर्षी महाविद्यालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते सेमिनार, प्रश्नमंजुषा, गटचर्चा आयोजित करण्यात येऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव व ऐतिहासिक आवडीला वाव देण्याचे कार्य इतिहास अभ्यास मंडळाद्वारे करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

दि. 9 मार्च 2025 रोजी सेमिनारचे आयोजन करण्यात आले. हिटलरचे परराष्ट्र धोरण या विषयावर बी.ए. भाग 3 च्या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. दि. 8 एप्रिल 2025 रोजी नाणे प्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयत करण्यात आले होते. नाणे अभ्यास व नाणे संग्रह करणारे मा. श्री. खोमणे सर यांनी आणलेल्या नाण्यांचे भव्य प्रदर्शन इतिहास विभागाद्वारे करण्यात आले.

अश्मयुगीन, प्राचीन, अर्वाचीन, मध्ययुगीन, शिवकालीन, मोगली इत्यादी सर्वच काळातील नाणी प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आली. युरोप, आशिया, अमेरिका इत्यादी प्रदेशातील परकीय चलनाचे प्रदर्शन सुद्धा भरवण्यात आले. रेल्वे, टिकीट, माचीस इत्यादी जुनी संग्रह येथे ठेवण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारुन सर्वच नाण्यांची माहिती घेतली व आपल्या ऐतिहासिक ज्ञानामध्ये भर टाकली. इतिहास अभ्यास मंडळाद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात येत आहे. संपूर्ण सत्रात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

**प्रा.डॉ. प्रमोद रामेश्वर चव्हाण**
**इतिहास विभाग प्रमुख**

# मराठी वाङ्मय अभ्यास मंडळ

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना मिळावी तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने सत्र 2024-25 मध्ये मराठी वाङ्मय अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. मराठी विभागाद्वारे विविध उपक्रम राबविले गेले. यामध्ये प्रामुख्याने वादविवाद स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, सेमिनार, घटक चाचणी, प्रश्नमंजुषा स्पर्धा इत्यादीचे आयोजन करण्यात आले होते.

दि. 21-02-2025 रोजी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त प्रा. दत्तात्रय भुतेकर गो.से. महाविद्यालय, खामगाव यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी मातृभाषा दिनानिमित्त आपले विचार व्यक्त केले.

दि.27-02-2025 रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी वैखरी राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा साजरा करण्यात आला.

### मराठी वाङ्मय अभ्यास मंडळ कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | कु. अर्चना शेंडगे | बी.ए.भाग 3 |
| उपाध्यक्ष | रोहित शिरसाट | बी.ए.भाग 3 |
| सचिव | कु.काजल क्षिरसागर | बी.ए.भाग 2 |
| सहसचिव | कु.श्रेया चौधरी | बी.ए.भाग 2 |
| सदस्य | कु.प्रांजली माकोडे | बी.ए.भाग 1 |
| सदस्य | आदित्य पुंड | बी.ए.भाग 1 |
| सदस्य | अमर हरमकार | बी.ए.भाग 1 |
| सदस्य | कु.अनुष्का सुशीर | बी.ए.भाग 1 |
| सदस्य | कु. श्रद्धा ढोले | बी.ए.भाग 1 |
| सदस्य | कु.कोमल ढोले | बी.ए.भाग 1 |

**डॉ. संजय पाटील**
**प्राचार्य**
**प्रा. डॉ. हर्षा ढाले**
**मराठी विभाग प्रमुख**

adopting sustainable practices in daily life, supporting policies that promote environmental protection, or engaging in community efforts to restore and conserve natural habitats.

The future of our earth mother depends on the choices we make today. Together, we can create a more sustainable and equitable world for future generations.

**Ankushka Sushir**
**B.A.I**

## Water and Nature

Cascading down, it's breathtaking,
Perfect and flawless – simply amazing.
The sound as deafening as thunder,
A serene beauty roaring with power.
White and glowing, an angelical formation,
A captivating image, filling me with emotion.
It's striking image on a starry night,
What a dazzling and glowing sight.
Flowers in the vicinity add to the beauty,
Crystal clear waters, glowing with purity.
A dazzling waterfall, a beauty of nature,
Serene yet powerful, a sight to capture.

**Atul Sadanshiv**
B.A.III

need for chemical fertilizers and pesticides. These practices also promote biodiversity and reduce the environmental footprint of food production.

3.Conservation and Restoration

Efforts to conserve and restore ecosystems are gaining momentum. Protecting existing forests, wetlands, and marine ecosystems through conservation efforts is essential to preventing further loss of biodiversity. Additionally, ecological restoration projects aim to bring damaged ecosystems back to health, such as reforesting areas, restoring coral reefs, and cleaning up polluted rivers.

4.Circular Economy

A circular economy is one that prioritizes recycling, reusing, and reducing waste, as opposed to the traditional linear model of "take, make, dispose." In a circular economy, products are designed for longevity, reparability, and recyclability. This reduces the strain on natural resources and helps minimize environmental pollution. Many companies and organizations are adopting circular practices to create a more sustainable future.

5.Public Awareness and Education

one of the most powerful tools in addressing environmental challenges is education. Increased awareness about environmental issues and their impacts has led to greater public demand for action. Environmental education initiatives, sustainable lifestyle choices, and grassroots movements have inspired millions of people to reduce their carbon footprints and advocate for policy changes.

Conclusion: A Call for Collective Action

While the challenges facing our environment are immense, they are not insurmountable. Through collective action, innovation, and a commitment to sustainability, we can reduce our environmental impact and build a more resilient and harmonious relationship with nature. Every individual has a role to play, whether by

3.Pollution

Pollution comes in many forms, from air and water pollution to soil contamination and plastic waste. Industrial activities, transportation, and improper waste management contribute to the buildup of harmful substances in the environment. The oceans, in particular, are facing an overwhelming amount of plastic pollution, which threatens marine life and the health of aquatic ecosystems.

4.Deforestation

Forests are vital for regulating the climate, supporting biodiversity, and maintaining the water cycle. However, large-scale deforestation for agriculture, mining, and urban development has led to the destruction of millions of acres of forest each year. This not only contributes to carbon emissions but also disrupts local communities and ecosystems that depend on these forests for survival.

Innovative Solutions and Hope for the Future

Despite the challenges, there is a growing global movement towards addressing environmental degradation. Governments, businesses, and individuals are all playing a role in finding solutions to protect and restore the environment. Some of the most promising solutions include:

1.Renewable Energy

It is one of the best sources to protect our earth. Transitioning to renewable energy sources like solar, wind, and hydroelectric power are key factors to reducing our reliance on fossil fuels and curbing greenhouse gas emissions. Advances in technology and decreasing costs have made renewable energy more accessible, and many countries are increasingly investing in clean energy infrastructure.

2.Sustainable Agriculture

Agriculture is both a contributor to environmental degradation and a potential solution. Sustainable farming practices, such as regenerative agriculture, agro forestry, and organic farming, help restore soil health, reduce waer usage, and minimize the

# Situation of Our Environment: Challenges and Solutions

Our planet is facing a range of environmental challenges that pressure the delicate balance of ecosystems and the health of its inhabitants, both human and non-human. From climate change to biodiversity loss, pollution, and deforestation, these challenges demand urgent action. However, alongside these threats, there is hope in the form of innovative solutions, growing environmental awareness, and a global movement toward sustainability.

## The Impact of Human Activity on the Environment

Human activity has had a reflective impact on the environment, particularly since the Industrial Revolution. The rapid urbanization, industrialization, and expansion of agriculture have led to significant changes in natural landscapes and ecosystems. Some of the major environmental issues caused by human activity include:

### 1.Climate Change

Climate change is perhaps the most pressing environmental issue of our time. Driven primarily by the burning of fossil fuels, deforestation, and industrial processes, human activity has led to an increase in greenhouse gases such as carbon dioxide and methane in the atmosphere. This has caused global temperatures to rise, resulting in melting ice caps, rising sea levels, more extreme weather patterns, and disruptions to ecosystems.

### 2.Biodiversity Loss

The ongoing destruction of natural habitats due to deforestation, urbanization, and agriculture has led to a dramatic loss of biodiversity. Species extinction rates have accelerated, with plants, animals, and insects disappearing faster than ever before. This loss of biodiversity has serious consequences, as each species plays a role in maintaining ecosystem stability, from pollination to food webs.

# Tree and Water – Nature's Heartbeat

Beneath the sky so wide and blue,
A tree stands tall where rivers run through.
Its branches stretch with leafy grace,
A haven green, a peaceful place.
Its roots reach deep in earth's embrace,
Where water flows in hidden space.
A silent bond, both old and true,
The tree and water—life's first crew.
The water sings in gentle streams,
It feeds the roots, it fuels the dreams.
The tree, in turn, gives shade and air,
A gift of life for all who care.
Together they weave nature's song,
In forests deep, where hearts belong.
No tree can thrive if water's gone,
No river flows without the dawn.
So guard them well, these friends so dear,
For in their life, our own is clear.
Tree and water—calm and wise,
The soul of Earth beneath the skies.

**Abhijeet Sadanshiv**
**B.A.II**

# Water Conservation

Save Water, Save Earth
Wasting water is wrong
Saving water is right
Brushing your teeth is right
Running taps are wrong
Watering trees is right
Throwing garbage in the water is wrong
Bathing in a bucket is right
Showering nonstop is wrong
Saving water is right
Wasting water is wrong.

**Apeksha Gaygol**
**B.A. II**

Schools can play an important role by teaching children about the environment. Students can organize tree planting drives, cleanliness campaigns, and recycling projects. We can also celebrate special days like World Environment Day to spread awareness. Talking to our friends and families about protecting nature also helps. When more people care, more people act.

The government and big companies also have a duty to protect the environment. They should make rules to stop pollution, protect forests and animals, and support clean energy like solar and wind power. But real change happens when each person takes responsibility.

Let us remember that we are not the owners of the Earth — we are its caretakers. If we take care of nature today, it will take care of us tomorrow. Our future depends on the choices we make now. Let's be responsible, thoughtful, and kind to our planet.

1."Save nature, save future."
2."Clean Earth, green Earth."
3."Plant trees, plant hope."
4."The Earth is our home — take care of it."
5."Pollution is a silent killer. Say no to it."
6."Don't let our future dry up — save water."

**Shraya Chaudhri**
**B.A.II**

# Our Planet, Our Responsibility

The environment is the world we live in. It includes the air we breathe, the water we drink, the trees and flowers around us, the animals in the forests, and even the weather. Everything in nature is part of the environment, and it plays a big role in our lives. Without a clean and healthy environment, life would not be possible.

Nature provides us with so many gifts. Trees give us oxygen to breathe and shade to rest under. Rivers and rain give us water to drink and grow food. The soil helps plants grow. Animals and insects keep our farms and forests alive and healthy. Even the sun and wind are part of the environment — they give us warmth and energy. Every part of nature has its own importance.

But today, our environment is facing many problems. One of the biggest problems is pollution. Smoke from cars and factories pollutes the air. Plastic waste and chemicals pollute the land and oceans. Water is getting dirty, and many animals are losing their homes. Another major issue is deforestation — cutting down too many trees. Trees help clean the air, stop soil erosion, and give shelter to birds and animals. Without trees, the Earth becomes hotter and drier.

Climate change is another serious problem. Because of pollution and too much use of coal, oil, and gas, the Earth's temperature is rising. This causes ice to melt, sea levels to rise, and weather to change. Some places have too much rain, while others face droughts. This not only harms nature but also affects people's lives, homes, and health.

We cannot ignore these problems anymore. The Earth is our only home, and we must take care of it. Everyone can help — young or old. Small actions can make a big difference. For example, instead of using plastic bags, we can carry cloth bags. We can use both sides of paper, turn off lights and fans when not needed, and save water while brushing our teeth. Planting trees is a simple but powerful way to help nature.

# My Passionate Nature

I love the sound of birds
so early in the morn,
I like the sound of puppies soon after they are born.

I love the smell of flowers
and the taste of honey from bees.
I love the sound the wind makes when it's blowing
through the trees.
I love the way the sky looks on a bright and sunny day,
and even when it's rainy, I love the shades of gray.

I love the smell of the ocean, the sound of waves upon the sand,

I love the feel of seashells and how they look in my hand.

And when the sun is gone, I love the moon that shines so bright,
I love the sounds of crickets and other creatures of the night.

So when I lay me down to sleep, I thank the Lord above,
For all the things of nature and more, all the things I love.

**Rohini Gawahade**
**B.A.I**

# Different Day

The darkness has gone ,
Sun has risen,
Open your curtains,
For the bright light

Wake up now,
Past has gone,
Birds are chirping,
And flowers are,
blooming.
Sit under the tree,
Let the cool air come,
Within the stroke of happiness.
And positivity with you.

Set of to work
With the peace in you,
be happy now
because the day is different

**Swarthik Ingle**
**B.A. III**

3.Afforestation and Reforestation: Planting more trees helps absorb $CO_2$, improves air quality, and preserves wildlife habitats.

4.Sustainable Agriculture and Organic Farming: Reducing the use of chemical fertilizers and adopting eco-friendly farming techniques helps protect the soil and water bodies.

5.Water and Energy Conservation: Turn off taps when not in use, fix leaks, use energy-efficient appliances, and promote rainwater harvesting.

6.Strict Environmental Laws: Governments must enforce laws to regulate pollution, protect forests, and promote clean industries.

7.Environmental Education and Awareness: Schools and media can play a major role in making people aware of their responsibilities toward nature.

Conclusion

We should switch to green substitutes if we want to rehabilitate the environment and deliver things ahead to normal since anthropogenic activities are destabilizing the globe. Microorganisms and plants, among other biological tools and entities, can aid in the restoration of polluted ecosystems and the reduction of the effects of global warming and climate change. Sustainability is the buzzword of the day, and if we don't get to work and start paying attention immediately, things can get out of hand. Using environmentally friendly and low-input biotechnological technologies, many of the issues highlighted and discovered in this study can be resolved. We have only begun to scrape the surface; further work and study are necessary. The Earth is diverse and, despite tremendous destruction, the majority of it is still undamaged, making it possible to solve environmental challenges with cutting-edge biotechnology technologies and methodologies.Environmental protection is not just the job of governments or scientists — it's a collective responsibility. By making small but consistent changes in our lifestyle and being conscious citizens, we can all contribute to a healthier, cleaner planet. The future of Earth depends on the actions we take today.

**Dr.Manohar Atmaram Wasnik**
**Associate Professor**
**Department of English**

urbanization, and deforestation rates are making conditions in developing countries worse. Greenhouse gases continuously increasing day by day and adversely impact the environment. Greenhouse gases mainly consist nitrous oxide, chlorofluorocarbon, methane and carbon dioxide.

An additional environmental risk in India is the open burning of crop waste in rural areas, especially during the rice harvesting season. The topic of burning agricultural trash in fields makes the front pages of newspapers in Delhi NCR twice a year, in the months of October and December. The region's ambient air quality has deteriorated due to the results of a static atmosphere state above Delhi during the Kharif agricultural harvest time (Kanawade et al., 2019). Due to year-round crop farming, India, the second-largest agrarian economy in the world, produces a substantial amount of agricultural waste, including leftover crops. Many different forms of surplus crop leftovers are burned depending on the agro-climatic zone, particularly in the northern regions of Punjab, Haryana, Uttar Pradesh, and Rajasthan; nonetheless, rice crop residues account for over half of all crop residues burned in the nation. Farmer's burn crop remnants left in the field after using combine harvesters to prepare the soil for the next crop in the simplest way feasible.

The long-term sustainability of the environment is vital to humanity's survival. In any event, we must conserve our ecosystem and habitats in order to sustain life on the blue planet, particularly human life. The current pace of the amount of destruction is substantially greater than the ability of ecosystems to recover or heal, and this must be reversed as quickly as feasible.

Possible Solutions

1.Reduce, Reuse, and Recycle: Follow the 3Rs to minimize waste generation. Recycling helps reduce pressure on natural resources.

2.Switch to Renewable Energy: Use solar, wind, or hydroelectric power instead of fossil fuels to reduce pollution and conserve resources.

# Environmental Issues and its Possible Solutions

Human activities are the main factors in the destruction of Earth's living conditions. Human impact has led to a rise in the amount of greenhouse gas emissions, global warming, soil contamination, natural resource depletion and contamination of the soil, water, and air, species extinction, the build-up of dangerous recalcitrant compounds, and other difficulties. Several conferences have emphasized the influence of environmental challenges in recent decades. However, the depth of understanding in order to define the term "environmental sustainability" is extremely poor, with disparities in the views considering the perspectives of distinct groups or individuals working in different occupations (Vezzoli and Manzini, 2008).The world's expanding environmental concerns are largely associated with increased human activity. The outlook for the availability of land, environmental health, and diversity has been steadily decreasing, with expectations of even worse conditions by 2050. To attain the aims of environmental sustainability that have so far been lacking, it is critical to incorporate the ecological and biological components. To rid the planet of anthropogenic concerns, an integrated strategy is essential on an urgent and ongoing basis. Biological techniques must be at the forefront and used to their full potential in order to accomplish environmental sustainability goals. This study discusses important environmental concerns, followed by remedies incorporating biological techniques to attain sustainable development, which has been researched and forecasted. Environmental challenges are a significant priority for all governments and scholars.

Environmental deterioration is a global issue that has an impact on the entire world. All types of living things are affected by pollution in some way. Even species that live in the poles or at the bottom of the ocean are affected by pollution. Anthropogenic activity has led to the emergence of numerous pollutants in recent decades, which have a detrimental impact on the ecosystem (Rockström et al. 2018). Industrialization,

# Annual Report of English Study Circle

The English study circle organizes various activities in the college. The department English organized special programme on 'Barriers to Effective Communication' on 30 September 2024.The department invited. Dr.Sanjay Patil, Principal, He explained by giving various examples of barriers to effective communication. He also stressed that communication is a broad field where you can shine your life and get self-employment. Dr. Niliama Deshmukh, Head of English Department put forth the purposes of the program and urged students to participate in the various activities that is organized by the department. The English study circle was announced at the end of the programme.

The English Study circle aims to instill and enhance language skills among students and give them confidence to use the English Language. So below activities were organized in the college by the department.

- Participative Activity for Demonstration: Loss of Information
- Teaching- Ability Enhancement Course.
- Use of ICT in Teaching Learning
- Certificate Course in Communication Skills
- Value Added Certificate Course - Basics of Computers
- Ppts and videos kept students engaged during online session.

**The English Study Circle**

1) President: Swarthik Ingle B.A.III
2) Vice President: Shraya Chaudhri B.A.II
3) Secretary: Komal Kamble
4) Member: Rohini Gawhade B.A.I
5) Member: Ankushka Sushir B.A.I
6) Member: Umakant Pinjarkar B.A.I

**Department of English**
**HOD. Dr. Nilima Deshmukh**
**Dr.Manohar A. Wasnik**

# Department Of English

The breeze, it dances through the trees,
A soft caress, a soul at ease.
The flowers bloom with colors bright,
Painting fields with pure delight.
No human hand could shape such grace,
No temple match this sacred place.
For nature speaks in silent ways—
A holy song that never fades.


By Unknown Author



स्वच्छता अभियान राबवितांना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक




मतदार जागृती अभियानात मा. तहसीलदार श्री पाटोळे साहेब यांच्या हस्ते तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त करताना महाविद्यालयाचा विद्यार्थी




Design of solar powered grass cutter (B.Voc)



इतिहास विभागातर्फे हिटलरचे परराष्ट्र धोरण या विषयावर सेमिनार

इतिहास विभागाद्वारा आयोजित नाणे प्रदर्शनी कार्यक्रमात नाणे अभ्यासक खोमणे सर






ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन




Use of
ICT
in Teaching

Use of
ICT
in Teaching








Workshop on
Personality
Developement




Use of ICT In Teaching

Peer Teaching






Participative activity

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

माणसांनी परमेश्वर निर्मित निसर्गावर घाला घातला आहे. विवेक हरवून बसलेल्या आजच्या माणसाने मोठमोठ्या इमारती उभारण्यासाठी घनदाट अरण्य उध्वस्त केली जात आहे. अन्न शिजवण्यासाठी, शेकोटी पेटविण्यासाठी, अमाप जंगलतोड केली जात आहे. कायद्याचा बडगा उगारला तरी कोट्यावधी चंदनाची चोरी होतच आहे. हे सारे पाहिले की वाटते माणूस किती अविचारी आहे. निसर्ग जणु माणसाला सांगतो की अरे, हे वृक्ष वर्षांनुवर्ष जंगलात उभे आहेत ते तुमच्यासाठीच आहे ना !

वृक्षाचे, फुले, फळे, पाने, सावली हे आपल्यासाठीच आहे ना. वृक्ष बाहू पसरून आपल्यासाठी पावसाची प्रार्थना करतात. वृक्ष आपल्या पायाखालची जमीन घट्ट पकडून ठेवतात व जमिनीची धूप थांबवतात. वातावरणातील प्रदूषण टाळण्यासाठी प्रयत्न करतात. अनेक अमूल्य औषध देतात.

वृक्ष स्वतः जळून इतरांच्या उपयोगी पडतात. वृक्षांचा प्रत्येक अवयव माणूस व पृथ्वीवरील सर्व जीवांना उपयुक्त आहे. वृक्षांजवळ भेदभाव नसतो ते सर्वांना समान वागणूक देतात. अगदी त्यांच्या अंगावर धावधावणाऱ्या कुऱ्हाडीचे पातेही तो सुगंधीत करतो. मनुष्य निसर्गाशी हितगुज करतो. वृक्ष मानवाचे एकदम जवळचे मित्र सुद्धा आहेत. विज्ञानामुळे माणसाने खूप प्रगती केली पण विकासासाठी माणसाने जंगलतोड केली. आपण या वृक्ष मित्राचा घात केल्याने स्वतःवरचं दुष्काळाचे, प्रदूषणाचे संकट, ओढवून घेत आहोत याचा माणसाला विसर पडला आहे. वृक्ष हे निसर्गाचे फुपफुसे आहेत. हवेतील कार्बनडायऑक्साईड शोषून घेतात आणि प्राणवायू हवेत सोडून हवा शुद्ध करण्याचे काम करतात.

त्यामुळे माणसाचे जगणे सुखी झाले आहे. हे वृक्ष यावेळी अनेक मौलिक गोष्टी आपल्याला देतात. भव्यता आणि निर्मलता ही तर त्यांची ठेवच आहे. पण सर्वांशी समान वागणूक हा त्यांच्या जीवनातून मिळणारा खरा संदेश आहे म्हणून माणूस आपल्या मुळाबाळांशी जसा वागतो तसाच तो झाडांशीही वागला पाहिजे आणि निसर्गाची योग्य ती काळजी आपण सर्वांनी घेणे अतिशय आवश्यक आहे.



**लक्ष्मी एकनाथ वडोदे**
**बी.ए. भाग ३**

# वृक्ष आपले मित्र

पृथ्वीतलावर सजीव प्राणी जीवजंतू यांचा महत्त्वाचा आधार म्हणजे वृक्ष. मानवाला जीवनासाठी महत्त्वाचा आवश्यक असलेला प्राणवायू म्हणजेच ऑक्सिजन देण्यासाठी वृक्ष महत्त्वाचे कार्य करतात. झाडे वातावरणातील सजीवांसाठी हानिकारक असणारा कार्बनडायऑक्साईड वायू शोषून आवश्यक असणारा ऑक्सिजन वायू पुरवतात. हवा शुद्ध व स्वच्छ करून वातावरण सुंदर बनविण्याचे कार्य झाडे करतात. झाड हा निसर्गाचा सर्वात जवळचा सोबती आहे. झाडापासून आपल्याला फळे, फुले, औषधे, वनस्पती, तेल, लाख, कापूस मध इत्यादी गोष्टी मिळतात. थोडक्यात काय तर झाडांचे पानफुल, फळ, देठ, खोड व मूळ अशा सर्वच अवयवांचा आपल्याला उपयोग होतो. झाडांपासून आपल्याला लाकूड मिळते. त्यांच्या उपयोग घरे इमारती बनविण्यासाठी फर्निचरसाठी इंधनासाठी होतो. फळांची मुळे जमिनीची होणारे धूप थांबवतात.

जमिनीत गेलेली मुळे मातीला धरून ठेवतात. जमिनीच्या आतील भागात पाण्याचा निचरा करण्यासाठी झाडांच्या मुळांचा उपयोग होतो. झाडे प्राणी व पक्षांचे निवासस्थान आहेत. बरेच प्राणी झाडावरच आपलं निवास शोधतात. झाडे जंगलात प्राण्यांच्या सुरक्षित ठेवण्यास मदत करतात. कारण प्राणी पक्षी ही आपली नैसर्गिक संपत्ती आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे असल्यास थंड हवा मिळते व चालणाऱ्या वाटसरूला त्याची खूप मदत होते. झाडे आपल्या पर्यावरणातील नैसर्गिक सौंदर्यात भर घालतात. म्हणजेच काय तर महत्त्वाच्या अन्न, वस्त्र, निवारा या तिन्ही गरजा भागवण्यासाठी वृक्षाची मदत होते. वृक्ष निस्वार्थीपणे सर्वांच्या मदतीला असतात परंतु माणूस आपल्या स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करू लागला आहे.

भारतात लोकसंख्या वाढू लागली आहे व या वाढत्यासंख्येला राहण्यास पुरेशी जागा उपलब्ध करून देण्यात जंगलतोड करून तिथे इमारती बांधल्या जातात. तसेच रस्त्यासाठी झाडांची तोड केली जाते. कारखाने उभारण्यासाठी झाडे तोडली जातात. अशा अनेक कामांसाठी झाडांची तोड करून प्रदूषणा ओढवून घेत आहे. सर्वांना झाडांचे महत्त्व समजून घेणे खूप आवश्यक आहे. झाडे ही पृथ्वीवरील मौल्यवान संसाधने आहे. आपण लोकांमध्ये जनजागृती केली पाहिजे. वृक्षतोड थांबवली पण मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग व दुष्काळ याला आळा घातला पाहिजे व आपल्या या नैसर्गिक साधन संपत्तीचे काळजीपूर्वक संवर्धन केले पाहिजे.



**सलोनी रमेश सदार**
**बी.ए. भाग 2**

गोष्टींमध्ये आपल्याला लाकूड जळावू लाकूड, फळे, कंदमुळे, डिंक, बांबू, चारा, फायबर अनेक वस्तू जंगलाच्या माध्यमातून मिळतात. जंगलातून तोड केलेले निम्मे लाकूड हे घरगुती स्वयंपाक आणि पाणी तापविण्यासाठी वापरले जाते. लाकूड हे घर बांधण्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात वापरले जाते.

दैनंदिन जीवनात कागद तयार करण्यासाठी कच्चामाल म्हणून लाकडाचा उपयोग केला जातो. बऱ्याच जंगलांचा उपयोग हा खाणकाम, शेती कूरणक्षेत्र, पर्यटन, मनोरंजनासाठी व धरणे बांधण्यासाठी केला जातो. म्हणुनच पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे महत्वाचे ठरते.



**सपना गवांदे**
**बी.ए. भाग - 2**

# जंगलतोड वनाचा ऱ्हास

अन्न, वस्त्र, निवारा व लाकूड आणि इंधन यासाठी माणूस हा वनावरच अवलंबून आहे. वाढलेल्या शहरीकरणामुळे तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे लाकूड आणि इंधन याची मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आहे. माणसाच्या गरजा पुरवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होणारी लाकूडतोड, खाणकाम इत्यादी गोष्टी या जंगलाचा ऱ्हास होण्यास कारणीभूत ठरतात.

वर्षानुवर्षापासून चालत असलेले निसर्गाचे आणि मानवाचे नाते आज माणूस विसरत चालला आहे. निसर्गाने युगानुयुगे दिलेल्या शुभेच्छा याची त्याला आठवणही राहिली नाही. शिल्लक स्वार्थापाई माणूस झाडे तोडतो, जंगले उद्ध्वस्त करतो आणि मग मागे उरते ते केवळ प्रदूषण.

आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये स्थानिक जंगलांचा मोठा वाटा आहे. कोळसा आणि जळावु लाकडांचा अतिवापर यामुळे जगलांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. शहरांची वाढ आणि शेती क्षेत्राची वाढ यामुळे मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड, त्याचप्रमाणे मोठे मोठे कारखाने उभे करण्यासाठी भुई सपाट करण्यात येणारी वने यामुळे वनक्षेत्र दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. अति प्रमाणात चराई, शहरीकरण यामुळे मोठ्या प्रमाणावर जंगलाचे शोषण होते आहे.

आजकाल पर्यावरण जपण्याची जाणीव निर्माण झाली आहे. त्यासाठी कायदे केले गेले आहेत. पण ते अजूनही अंमलात येत नाहीत. वाहनांसाठी आवश्यक असणारी पियूसी चाचणी करणे कारखान्यातील दूषित हवेची जबाबदारी पार पाडणे कोरडा कचरा आणि ओला कचरा याची विभागणी करणे या लहान सहान पण फार महत्त्वाच्या गोष्टी करून आपणाला विशुद्ध पर्यावरण टिकवणे आवश्यक आहे तरी निष्ठा लोकमानसात रुजवली गेली पाहिजे. उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करून पर्यावरणाचे, पर्यायाने जंगलाचे रक्षण आणि संवर्धन केले पाहिजे. जंगल तोडीचा हा प्रश्न काही प्रमाणात कमी करता येईल. किमान मर्यादित ठेवता येईल. पण त्यासाठी पृथ्वीवरील प्रत्येक माणूस याबाबत जागरूक झाला पाहिजे. 'झाडे लावा झाडे जगवा' ही मोहीम प्रचंड प्रमाणावर फोफावली गेली पाहिजे. पर्यावरणाचे महत्व लहानपणापासूनच मनावर बिंबवायला सुरुवात केली गेली पाहिजे. उद्याचा नागरिक हा पर्यावरण जागरूक नागरिक हवा.

मानवाला अत्यावश्यक असणाऱ्या बहुतांश गोष्टी या आपल्याला जंगले पुरवतात. जंगलातून मिळणाऱ्या

पालन केले पाहिजे. मानवी अस्तित्व आणि पर्यावरण संरक्षण या दोन्हीमध्ये पर्यावरणाची भूमिका महत्त्वाची आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्याचे अनेक मार्ग आहेत. पर्यावरण विषयक जागरूकता काळजी आणि संरक्षण हे पर्यावरणाच्या आरोग्यासाठी तितकेच महत्त्वाचे आहे.

झाड


तुझ्या सावलीतील किती शीतलता
तुझ्या पानात किती लवचिकता
तुझ्या फुलात किती मोहकता
तुझ्या रसात किती अविटपणा
तुझ्या फळात किती गोडवा
तुझ्या मुळात किती कठीणपणा
तुझ्या आकारात किती मोठेपणा

पर्यावरण दिन

निसर्गाची सुंदर देण, अद्भुत प्रफुल्लीत पर्यावरण
कुशीत त्यांच्या सारे नांदती, मानव पशुपक्षी सारे जण
अभिलाषा जिज्ञासा मानवी, हस्तक्षेप पर्यावरणात करी
निसर्गाचे बिघडे संतुलन, प्रदूषण वाढले पृथ्वीवरी
अशुद्ध हवेत श्वास घेण्यास, मानव मजबूर झाला
विविध आजारांनी आज, बहुत त्रस्त तो झाला आहे

एक वेळ अशी येईल,मानवी जीवन असंभव होईल
निश्चित पर्यावरणामध्ये,श्वास त्याचा गुदमरुन जाईल

पर्यावरणाच्या रक्षणाची,आपण आता करूया प्रयत्न
वसुंधरेला वाचवण्यासाठी,जबाबदारी स्वीकारू आपण



**काजल राम क्षिरसागर**
**बी.ए. भाग 2**

निसर्ग माझा मित्र
निसर्ग माझा गुरु
निसर्ग माझी माय
मी त्याचे लेकरु

आजच्या विज्ञान युगात माणूस जेवढा इंटरनेटच्या जाळ्यात अडकत चालला आहे. त्यातून निसर्गाकडे आकर्षित होतो म्हणूनच या धकाधकीच्या जीवनातही माणूस दोन दिवस का होईना वेळ काढून निसर्गाचे सानिध्यात वेळ घालवितो. पर्यावरण म्हणजे आपल्या भोवतालचा परिसर त्याच सर्व सजीव व निर्जीव वस्तूंचा समावेश होतो झाडे तर पर्यावरणाचा आत्मा आहे.

एक झाड जर समोर असलं
तर घराचं संरक्षण होतं
उन्हाने दिवसभर तडपून
जगाला शीतलता देतो.

म्हणूनच पर्यावरण निसर्ग आणि मानव यांच्यातील अतूट स्नेहसंबंध पुरातन काळापासून आहे.

पर्यावरणाने आपल्याला अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत सोयींसह अन्य अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु मानवाच्या हव्यासाने पर्यावरणाचा बेसुमार वापर करून त्याचा त्रास केल्यामुळे अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. आपण अन्नाशिवाय एक दिवस आणि पाण्याशिवाय एक तास राहू शकतो परंतु हवेशिवाय आपण क्षणभरही जीवंत राहू शकत नाही. पर्यावरणातील महत्त्वाचे काम झाडे करीत आहेत. वनस्पती शोषून घेतात आणि मानवा-ला उपयुक्त असा ऑक्सिजन हवेत सोडतात. त्यामुळे वृक्ष लागवड व संवर्धन करणे हे माणसांचे कर्तव्य आहे.

पर्यावरण हा आपल्या ग्रहाचा सर्वात अमूल्य पैलू आहे. केवळ पर्यावरणामुळेच जीवनसृष्टीची उत्पत्ती झाली आहे. पर्यावरणाचे जतन हे मानवासाठी पर्यावरणाप्रमाणेच महत्त्वाचे आहे. पर्यावरण हे सर्व नैसर्गिक साधनांचे आणि मूर्त कलाकृतींचा आपल्या जवळच्या परिसराचा संदर्भ देते. वातावरण हायड्रोस्पियर लिथोस्पियर आणि बायोस्फियरसह जीवनासाठी आवश्यक असलेले सर्व घटक समाविष्ट करतात.

पर्यावरण हा एका व्यक्तीचा वारसा नसला तरी प्रत्येकाने पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणे गरजेचे आहे . आपण झाडे लावली पाहिजेत. झाडे तोडण्यास मनाई करावी. दूषित घटक आणि हानिकारक वायू पासून संरक्षण करण्यासाठी नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करून त्यांचे

# पर्यावरण संवर्धन काळाची गरज

पर्यावरण म्हणजे सजीवांच्या जीवनावर परिणाम करणारे भोवतालची परिस्थिती निसर्गही ईश्वराने निर्माण केलेली अद्‌भुत  गोष्ट आहे. सुंदर फुले हिरवी झाडे वेगवेगळे रंग आणि रूप असलेले पशुपक्षी इत्यादी गोष्टी आपले मन मोहुन घेतात. मानवी जीवनात झाडांचे महत्त्व विशेष आहे. झाडे मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. ते मनुष्य जीवनाचा आधार आहे. याशिवाय पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व भरपूर आहे.

परंतु आज मानवाने आपल्याला नवनवीन शोधांच्या अभिलेख यामुळे पर्यावरणाला नुकसान पोहोचवणे सुरु केले आहे. अशा काळात पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज झाली आहे. पृथ्वीवरील अनेक प्राणी आपल्या अन्नासाठी वृक्षांवर अवलंबून आहेत. मनुष्य हवेत असलेल्या ऑक्सिजन प्राणवायू श्वासाद्वारे ग्रहण करतो. अशा पद्धतीने वृक्ष मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. मागील काही वर्षांमध्ये देशातील कारखान्यांची संख्या वाढली आहे. या कारखान्यात लागणारा कच्चामाल, देशातील वाढती लोकसंख्या अशा अनेक गोष्टी वृक्षतोडीसाठी कारणीभूत आहेत.

देशात होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास वेळीच रोखण्यात आला नाही तर येत्या काळात ही खूप मोठी समस्या बनवून जाईल. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून जगभरातील देश वृक्ष लागवड व जास्तीत जास्त पीएनजी गॅस चा उपयोग करु लागले आहे. पर्यावरण आपले भविष्य आहे म्हणून याचे संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष द्यावे लागेल. पर्यावरणाला दुरुस्त करण्यासाठी सर्वात आधी जलप्रदूषणाला रोखावे लागेल. कारखान्याचे खराब पाणी, घरातील दूषित पाणी, नाल्यांमुळे मधून वाहणारा मल इत्यादी समुद्रात जाण्यापासून रोखले गेले पाहिजे. कारखान्यातून निघणारे विषयुक्त पाणी पिऊन जलचर व उभयचर प्राण्यांचे मृत्यू होतात. तेच प्रदूषित पाणी शेतात वापरले जाते व दूषित पाण्यात उगवलेले भाजीपाला खाऊन आपल्या आरोग्य बिघडण्याचा धोका असतो. म्हणून सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की जर आपल्याला उदयाला आरोग्यदायक बनायचे आहे. तर आजपासूनच प्रयत्न करायला हवे. जलप्रदूषण नंतर वायू प्रदूषणांनी पर्यावरणाला खूप हानी पोहोचवली आहे. मोठ्या कारखान्यांच्या चिमण्यांमधून निघणारे धूर, रेल्वे व इतर पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमधून निघणारे धूर वायुमंडळात मिसळून वातावरण प्रदूषित करतो.

जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि माती प्रदूषण झाल्याने सजीव सृष्टी धोक्यात आली आहे. जागतिक तापमानात वाढ झाली आहे. पर्यावरण ही आपल्यासाठी अमूल्य देणगी आहे पण हे वातावरण टिकविणे आपल्याला हातात आहे. झाडाचे महत्व जाणून आपण जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजे. पर्यावरण स्वच्छ आणि सुंदर ठेवले पाहिजे पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे.

- जुनाट आजारांवर आयुर्वेदिक औषधी वनस्पतीच आवश्यक असते.
- झाडांमुळे हवेमध्ये गारवा थंडावा राहतो.
- उन्हाळ्यात माणसांना जनावरांना थंडगार सावली मिळते.
- झाडांच्या मुळांमुळे मातीची झीज होत नाही.
- उन्हामुळे होणारी जमिनीची धूप थांबते.
- औषधी व बलयुक्त मध झाडांपासूनच मिळते.
- झाडांमुळे ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषण थांबवण्यासाठी मदत होते.
- झाडांमुळे ढगाला थंडावा लागतो पाऊस पडतो आणि पाणी प्रश्न दूर होतो.
- सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे झाडांपासून शोषणासाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या शुद्ध ऑक्सिजन वायूचा पुरवठा होतो

झाडांच्या अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये झाडे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड वायू शोषून घेतात जो मानवाला हानिकारक असतो आणि शुद्ध ऑक्सिजन सोडतात.पृथ्वीच्या सौंदर्यात वाढ होते. झाडांचे वरील सर्व उपयोग पाहता वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन व वृक्षाचे जतन करणे किती आवश्यक आहे हे आपणास कळून आलेच असेल. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, कारखाने वाहनांचा वाढता वापर वाहनांमध्ये रॉकेल भरणे, नदीमध्ये कारखान्यातील शहरातील सांडपाणी सोडणे, वृक्षांची अमाप तोड करणे इत्यादी कारणांमुळे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व जल प्रदूषण होऊन पर्यावरणाचा अंतर्गत समतोल बिघडला आहे. वाढत्या कार्बनडा ऑक्साईडमुळे आकाशातील ओझोन वायूचा थर कमी होऊन सुर्याची अल्ट्रा व्हायोलेट किरणे पृथ्वीवरील सरळ येत असल्यामुळे पृथ्वीवरील उष्ण तापमानाने वाढले आहे. पाण्याचे बाष्पीभवन वाढले. त्यामुळे अंगाची लाही लाही होत आहे. तसेच अनेक भागात सुनामी लाटा भुकंप होतांना दिसत आहे म्हणून

जंगल तुटले, प्राणी घटले
जमीन अस्वच्छ, पाणी आटले !
बिघडले सर्व जगण्याचे मंत्र
जुळले कसे निसर्गाचे तंत्र ?

अशा चार ओळी सहज ओठांवर येऊन जातात. म्हणून प्रत्येक पावसाळ्यात प्रत्येकाने किमान दहा झाडे लावणे आवश्यक आहे. दहा पैकी किमान दोन तरी झाडे सहज वाचतील व पर्यावरण संतुलनास मदत होईल.

**कोमल संतोष ढोले**
**बी.ए. भाग 1**

# वृक्ष संवर्धन काळाची गरज

मानवाला मिळालेल्या सुंदर जीवनाचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, हवा, पाणी, सूर्यप्रकाश इत्यादी अनेक गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. या सर्व गोष्टी सहजपणे मिळवण्यासाठी पर्यावरणाचे संतुलन राहणे आवश्यक आहे. पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. नुसते वृक्षारोपण करून चालणार नाही तर वृक्ष संवर्धन व त्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे.गेला काही दशकांपासून लोकसंख्या वाढीचा आलेख वरचेवर चढताना दिसून येत आहे. शासनाने कुटुंब नियोजनाची अनेक साधने उपलब्ध करून दिली तरी वाढत्या लोकसंख्येचा भस्मासुर आवासून उभा आहे. प्रथमतः लोकसंख्या नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे. वाढत्या लोकसंख्येला मूलभूत व अत्यावश्यक दर्जा पुरविण्यासाठी विज्ञान आणि शास्त्रज्ञांनी खूप प्रगती केली आहे. यामध्ये रोबोट, संगणक शेतीची अवजारे कारखाने रेल्वे, विमाने इत्यादी निर्माण केले. यांत्रिक युगामध्ये दुचाकी, चारचाकी वाहनेही भरपूर प्रमाणात वाढली आहेत. लोकसंख्या वाढीबरोबरच कारखाने ही वाढू लागले आहेत. नवनवीन वाहने दररोज मोठ्या संख्येने तयार होऊ लागले आहेत. त्यामुळे वाहने वापरणारे ही वाढले मग काही लोक वाहनांमध्ये इंधन म्हणून रॉकेल वापरू लागले आहेत. त्यामुळे ध्वनी प्रदूषणाबरोबरच वायुप्रदूषण खूप वाढत आहे. तसेच वाढत्या औद्योगीकरणामुळे कारखान्यातून निघणारा धूर व उष्णता यामुळे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येत आहे त्याला आळा घालण्यासाठी व प्रदूषण थांबवण्यासाठी काही ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामध्ये वृक्षारोपण हे अत्यंत महत्त्वाचे कार्य सर्वांनी घेतले पाहिजे. तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे व विभक्त कुटुंब पद्धतीमुळे लग्नानंतर लगेचच वेगळी चूल मांडणारे भरपूर आहेत. त्यामुळे सर्व साधारण गरीब शेतकरी चुलीला सरपनासाठी जंगलतोड चालूच राहणार आहे. त्याचबरोबर घरी, इमारती बांधताना लागणारी सेंट्रींग, दारे, चौकटी, खिडक्या इत्यादींसाठी जंगलतोड चालू आहे. व चालूच राहणार आहे. त्याबरोबर वीट, भट्टी, बेकरी, हॉटेल, लग्न समारंभ इत्यादी ठिकाणी जडतनासाठी सर्रास लाकडांचे मुक्तहस्ते वापर केला जात आहे. तसेच कागद पेन्सिल, लाकडी कपाट, टेबल खुर्च्या, प्लायवुड, सनमाइका बनविणारे कारखाने व पलंग दिवाण वाहनांची बॉडी इत्यादी अनेक कामांसाठी लाखो वापरले जाते. या सर्व गरजा भागविण्यासाठी अमाप जंगलतोड चालू आहे. परंतु त्या प्रमाणात झाडे लावणे, वाढविणे, जगविणे ही कामे थांबलेली दिसून येत आहे. आणि पर्यावरण संतुलनासाठी झाडे लावणे अत्यंत गरजेचे आहे, नव्हे ती काळाची गरज आहे. कारण झाडे ही आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

* झाडांपासून मानवाला मिळणारे फायदे

- लकडी टेबल, खुर्च्या, चौकटी, दारी, खिडक्या इत्यादी लाकडी वस्तू झाडांपासूनच मिळतात
- डिंक, फुले, फळे महत्त्वाची औषधे झाडांपासूनच मिळतात.

वृक्ष संवर्धनाचे महत्त्व फक्त पर्यावरणामुळे मर्यादित नसून ते समाज अर्थव्यवस्थेच्या आणि मानवत वाचा आरोग्याची देखील संबंधित आहे वृक्षामुळे शुद्ध हवा मिळते जे पर्यावरणातील प्रदूषण कमी करण्यास मदत करते हवेतील धुलीकरण आणि विषारी घटक वृक्षांच्या पानांमुळे रोखले जातात ज्यामुळे लोकांमध्ये अस्थमा शोषणाच्या विकार हृदयविकार असे रोग कमी होऊ शकतात तसेच वृक्ष जैवविविधतेचे संरक्षण करतात कारण ते अनेक प्राणी पक्षी कीटक आणि वनस्पतीचे घर असतात यामुळे परिसंस्थेतील जैविक संतुलन टिकून राहते.

**श्रध्दा कैलास ढोले**
**बी.ए. भाग 1**

अनेक स्थानिक उद्योग हस्तकला औषधी वनस्पती उत्पादन यांच्यावरही शतक सकारात्मक परिणाम होतो विशेषता ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोकांच्या उपजीविकेचा मुख्य आधार जंगलातील विविध साधन संपत्ती असतात वृक्षांची आणि वनसंपत्तीच्या आणि म्हणजे या समुदायाच्या उपजीविकेवर अद्याप होणे होय त्यातून बेरोजगारी स्थलांतर आणि जीवनमान हलवणे यांच्यासारख्या समस्या निर्माण होतात यासाठी वृक्ष संवर्धनामुळे केवळ पर्यावरणाचाच नाही तर समाजातील अनेक घटकांचा विकास साधता येतो

आर्थिक प्रगतीसाठी वृक्ष संवर्धनाचे फायदे आहेत पर्यटन क्षेत्रात देखील वृक्षाचे संवर्धन विशेष आकर्षण ठरते जैवविविधतेने संपन्न असे वन पर्यटन हवे असेल तर जंगलामध्ये अधिक वृक्ष असणे गरजेचे आहे. अनेक देशात पर्यावरण पर्यटनातून अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागतो त्याचबरोबर वृक्षामुळे पाण्याच्या साठ्यांमध्ये वाढ होऊन भूजल पातळी स्थिर राहते असे असल्याने शेतीसाठी पाण्याची पुरवठा शाश्वत राहते आणि त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेची प्रगती होऊ शकते

वृक्ष संवर्धनाचे दृष्टीने जनजागृती अत्यंत महत्त्वाचे ठरते. शिक्षण प्रणालीमध्ये वृक्ष संवर्धनाचे महत्त्व त्याचे फायदे आणि त्याचे पर्यावरण आरोग्य व सामाजिक परिणाम याबद्दल माहिती दिली पाहिजे माध्यमातून वृक्ष संवर्धनाची संदेश प्रसारित करून समाजात वृक्षाची काळजी घेण्याची जाणीव निर्माण करता येते शहरीकरणाच्या प्रक्रियेत अनेकदा वृक्षाचे महत्त्व विसरले जाते म्हणून स्थानिक पातळीवर कार्यरत असणाऱ्या संस्थांकडून विविध उपक्रम राबवले जातात वृक्ष लागवड वृक्षांचे संरक्षण आणि त्याच्यावर होणारे परिणाम लक्षात घेऊन योजनेचे नियोजन करणे आवश्यक आहे शेवटी वृक्ष संवर्धन ही एक सामाजिक जबाबदारी आहे आजच्यासारख्या वेगाने बदलणारे युगात जागतिक तापमान वाढप्रदूषण आणि जलस्त्रोतांची कमतरता यांसारख्या समस्यांचा सामना करण्यासाठी वृक्ष संवर्धनाशिवाय दुसरा कोणताही उपायाने वृक्ष संवर्धना द्वारे निसर्ग आणि माणूस एकमेकांच्या सह अस्तित्वाच्या विचारांना पूरक ठेवू शकतात प्रत्येक व्यक्तीने वृक्ष संवर्धनाचा संकल्प करून भविष्यातील जीवन सुखकर बनवण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे

वृक्ष संवर्धनाची गरज समजून घेण्यासाठी त्याचे महत्त्व सर्वप्रथम पर्यावरणाशी जोडलेले आहे वृक्ष म्हणजे निसर्गाच्या आधारस्तंभ असून ते पर्यावरणात संतुलन राखण्याची काम करतात वृक्ष वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून ऑक्सिजनची निर्मिती करतात जे पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अस्तित्वाप्रमाणे अत्यावश्यक आहे वृक्षांमुळे जमिनीतील आद्रता टिकून राहते मातीची धूप टाळली जाते आणि पावसाच्याप्रमाणे संतुलित राहाते अलीकडच्या काळात औद्योगिकीकरण शहरीकरण आणि मानवी उपभोगाच्या वाढत्या प्रमाणामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे ज्यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होत आहेत त्यामुळे वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज आवश्यक गरज बनली आहे.

# वृक्ष संवर्धन काळाची गरज

वृक्ष संवर्धन काळाची गरज समजण्यासाठी सर्वप्रथम वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व समजून घ्यावे लागेल. वृक्ष निसर्गाचा आधारस्तंभ आहे. ते केवळ ऑक्सिजन तयार करतात असे नाही तर पर्यावरणातील कार्बनडाऑक्साईडचे प्रमाण नियंत्रित करतात. हे प्रक्रिया पृथ्वीवरील जीवनसृष्टीच्या अस्तित्वासाठी अत्यंत आवश्यक आहे. वृक्षांच्या अभावामुळे पर्यावरणात अनिष्ट बदल घडू लागले आहेत. ज्याचा परिणाम सजीव सृष्टीवर आणि मानवांच्या दैनंदिन जीवनावर होतो. वृक्षतोड वाढल्याने भूमीचा विनाश, जमिनीची धूप आणि पाण्याचे साठे कमी होत आहे. पावसाचे प्रमाण कमी होण्यास आणि पृथ्वीच्या तापमानात वाढ होण्यास वृक्षतोड हे मुख्य कारण आहे.

आज आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाला महत्त्व दिले जाते आहे यामुळे अधिकाधिक जंगलांचा नाश होतो कारण नवीन शहरे, रस्ते, उद्योग या सर्वांसाठी मोकळी जागा हवी असते मात्र या प्रक्रियेत नैसर्गिक संसाधनांचे नाश होत असल्यामुळे पृथ्वीवरील जैवविविधता धोक्यात येते असेच चालू राहिले तर निसर्गाचा समतोल बिघडेल आणि पृथ्वीवर अनिष्ट परिणाम दिसून येतील तसेच अन्नसाखळी हवा पाणी आणि जमीन यांच्यातील समतोल राखण्याच्या दृष्टीने वृक्ष संवर्धन हा एकमेव मार्ग आहे.

वृक्ष संवर्धन केवळ पर्यावरणाच्या संरक्षणासाठी नव्हे तर माणसाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. वृक्षामुळे निर्मळ हवा मिळते. विविध रोगांचे प्रमाण कमी राहते आणि तापमान नियंत्रित राहण्यास मदत मिळते शिवाय वृक्ष हे अनेक औषधी वनस्पचे स्तोत्र आहे. त्यामुळे वृक्ष संवर्धन केल्याने आरोग्यदायी वातावरण मिळण्यास मोठी मदत होते आणि कीटक यांचा अधिवासाचा नाश होत आहे. या जीवनाचा पर्यावरणाच्या संतुलनात अनन्य साधारण महत्त्व असते. त्यामुळे त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे वृक्ष संवर्धन केल्याने त्याच्या अधिवास सुरक्षित राहतो आणि जैवविविधतेची संरक्षण करता येते

वृक्ष संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे शाळा महाविद्यालय विविध सामाजिक संघटना वनविभाग आणि शासकीय संस्थांची वृक्षारोपण कार्यक्रम राबविले पाहिजे प्रत्येक व्यक्तीने त्याच्या घरात जवळ शाळांमध्ये रस्त्यावर किंवा सर्वजण ठिकाणी वृक्ष लावले पाहिजे वृक्ष संवर्धनाच्या माध्यमातून केवळ पर्यावरणाचे रक्षण होत नाही तर भावी पिढ्यांसाठी एक निरोगी आणि संपन्न जीवन देण्याचा संकल्प साकार होतो

वृक्ष संवर्धनाची आवश्यकता समजून घेण्यासाठी त्याचा समाजावर आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम समजणे देखील तितके महत्त्वाचे आहे वृक्षाच्या अस्तित्वामुळे केवळ पर्यावरण संतुलित राहते असे नाही तर

झाडे आपले रक्षण करतात. झाडे स्वतःचे आत्मसमर्पण करतात ते आपल्याला त्याच्या जवळ असेलेले पाने, फुले, फळे, सर्वकाही काही देतात. आपल्याला सावली - विश्रांती देतात. आपला सत्कार करतात. अतिथीला ते मुखसंवेदनेन जाणतात अन म्हणतात. 'आयीये बैठीये विश्रांती किजीये' लगेच शेजारी वाहणारे झुळझुळ पाणी पिण्याचाही इशारा देतात. याप्रमाणे बऱ्याच गोष्टी न सांगताही सांगून जाणारे आपले वृक्षवल्ली सोयरे आहेत त्यांचे रक्षण करणे आपले आद्य कर्तव्य आहे.

तरी माणूस वृक्षाचे उपकार जाणत नाही उलट आता स्वतःचे घर बांधण्यासाठी वृक्षावर असलेल्या पशु पक्षांचे घर उजाडतो आहे. माणूस हा खूप मतलबी असतो तो स्वतःच्या मतलबासाठी कोणती हद्द पार करतो एखाद्या माणसाने केलेले उपकार जाणत नाही. तर ही झाड आहेत ते कोणाला काही बोलू शकत नाही.

झाड ही संताप्रमाणे असतात ती कोणाला काहीही बोलत नाही व स्वतः कडे जे काही आहे ते सर्व इतरांना देण्याचा प्रयत्न करतात कोणी त्याला तोडायला लागले तरी ते थांब तोडू नको असे म्हणत नाही. पण माणसाने स्वतःला समजायला हवे की जर आपण झाड तोडली तर आपण स्वतःची नव्हे तर इतर प्राणी पशु पक्षांची व संपूर्ण पक्षांची निसर्गाची हानी करत आहे.

माणसाने आपली वृक्षतोड थांबवली नाही तर लवकर या पृथ्वीच्या या सुजलाम सुफलाम धरतीचा नाश होईल आणि संपूर्ण सजीव सृष्टी नाश पावेल म्हणून आपण सर्वांनी मनापासून झाडे लावा झाडे जगवा हा प्रकल्प हाती घेतला पाहिजे.

झाडे लावा दारोदारी,
समृद्धी होईल घरोघरी.

**अनुष्का विनोद सुशीर**
**बी.ए. भाग - 1**

# वृक्ष संवर्धन काळाची गरज

पूर्वीच्या काळामध्ये झाडांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात असल्याने वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण विपुल होते. त्यासोबतच माणसाला शुद्ध हवा मिळाल्याने माणसाचे जीवन देखील अधिक काळ असायचे. तसेच मोठमोठी जंगले उभारलेली असल्याने पाऊस देखील खूप मोठ्या प्रमाणात पडायचा व प्रदुषणाचे प्रमाण देखील खूप मोठ्या प्रमाणात कमी होते.

अन्न आणि पाण्याशिवाय मनुष्य काही वेळ जीवंत राहू शकतो. पण हवेशिवाय माणूस काही मिनिटे देखील जीवंत राहू शकत नाही. यावरून तुम्हाला कल्पना होईल की हवा ही आपल्यासाठी किती गरजेची आहे. त्यामुळे झाडांचे महत्त्व देखील तितकेच गरजेचे आहे.

परंतु आजच्या काळामध्ये प्रदूषण आणि ग्लोबल वॉर्मिंगचे संभाव्य धोका टाळण्यासाठी वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि वृक्ष संगोपन करून पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे. वृक्ष लागवडीने वृक्ष क्षेत्रामध्ये झाडांची संख्या वाढून पर्यावरणाचा समतोल बनवण्यासाठी शासन अलीकडच्या काळामध्ये अनेक अभियान राबवत आहे. सर्व मनुष्याला निसर्गाच्या सानिध्यात आवडते. या निसर्गाला सुंदर असे रूप देण्याची भूमिका केवळ वृक्ष बजावतात. आपल्या आजूबाजूला दिसणारा सुंदर निसर्ग हा झाडांमुळेच शक्य झालेला आहे. त्यामुळे वृक्षारोपण करणे काळाची गरज बनली आहे.

माणूस हा भिकारी नाही तर परमात्याने निर्माण केलेला विश्वाचा तो राजकुमार आहे. या राजकुमाराचे जीवन सीमित कसे असणार हा कुमार त्याच्या आईशी जोडला गेला आहे. या जोडल्याचा शोध घेत मागे परतलो, तर सृष्टीच्या मुळापर्यंत आपण जोडलेलेच दिसू आणि सृष्टीचा कधी अंत झाला तर तेथेही आपण जोडलेले दिसू आणि आपण दोन्हीही बाजूंनी अंताशी जोडलेले आहोत. मग आपण भिकारी आहोत का नाही आपले पाय पृथ्वीवर जोडले आहेत. पृथ्वी पाण्याशी जोडलेली आहे व पाणी वृक्षांशी जोडलेले आहे. वृक्षवल्ली अन्नाच्या रूपाने आपल्याला जीवनदान देत आहे आपल्या जीवनाचे सर्व क्षण काळाच्या एका मालिकेत जुळलेले आहे.

वृक्ष संरक्षण कार्य पुत्रवत मानवैः सदाः<br>
छाया फल प्रदानेन वृक्षा रक्षन्ति रक्षिताः ।।

मोठी देणगी म्हणजे झाड, झाडे आहेत म्हणुनच आपण या जगात सुखरूप राहू शकतो. झाडांपासून आपल्याला जीवनावश्यक वस्तु मिळतात. त्यामुळे माणसाच्या जीवनात झाडांना खूप महत्त्व आहे. झाडे ही मनुष्याचा आधार आहे. याशिवाय पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी परंतु आजकाल मानवाला नवनवीन गोष्टींचा शोध घेणे नवीन प्रयोग करून त्यातूनच झाडांना हानी पोहचवणे या गोष्टी दिवसेंदिवस वाढत आहे. वाढते शहरीकरण, औद्योगीकरण यामुळे झाड तोडले जाते त्या प्राण्यांना राहायला जागा नाही.

प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन गरजांची पूर्ती करणारा वृक्ष आजही मानवी जीवन आणि समाजाच्या अस्तित्वाच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. वृक्ष केवळ आपले जीवन प्रभावित करतात असे नव्हे तर मानवाची सेवा करण्यात निसर्गाचा फार मोठा सहभाग आहे. वृक्षापासून आपणास इंधन, भाजीपाला, फळे, औषधी मिळते. भूमी आणि जल संरक्षणाचे काम वृक्ष करतात. पाण्याचा दुष्काळ, पूर नियंत्रण, जमिनीची धूप या गोष्टी रोखण्यासाठी वृक्ष महत्वाचे ठरतात. जमिनीचा ओलसरपणा टिकवून ठेवण्यासाठी वृक्षाचा उपयोग होतो.

मानवाचे कल्याण करणे, वृक्ष आपल्या सभोवतालाच्या परिसर सुंदर करतातच पण वातावरणातही सुगंधित करतात. त्यामुळे शांती आणि आनंद वाटतो. वृक्ष स्वतः उन्हात उभे राहून आपल्याला सावली देतात. मनापासून आपल्याला डिंक, कागद, रबर या नित्यउपयोगी वस्तू मिळतात असे असूनही आज मानव रोज झाडे तोडत राहतो. पण तीच पुन्हा लावली नाही तर हिरवीगार जंगले त्याने उजाड करून टाकली आणि त्यामुळे पर्यावरणाची भयंकर समस्या आपल्यासमोर उभी राहिली. आपल्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी उभे असणारे वृक्ष आपले जीवनदाते आहेत. पर्यावरणाची भयंकर समस्या आपल्यासाठी उभी राहिली. आपल्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी उभे असणारे वृक्ष आपले जीवनदाते आहेत. म्हणून आपण जुन्या वृक्षाची काळजी घेतली पाहिजे. जास्तीत जास्त वृक्ष दरवर्षी लावले पाहिजे.



**साक्षी रवींद्र जाधव**
**बी.ए. भाग-2**

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणजे झाड आपला मित्र हो. खरंच वृक्षवल्ली नाही तर जीवन सुद्धा नाही. मानवाची सेवा करण्यात निसर्गाचा फार मोठ्या सहभाग आहे. वृक्ष केवळ आपलेच जीवन प्रभावीत करतात. असे नव्हे तर आपले अस्तित्व सुरक्षित ठेवण्यासाठी संजीवनी प्रदान करतात. प्राचीन काळापासून मानवाच्या दैनंदिन वृक्षापासून आपणास अन्नधान्यातून ते घर सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तू सर्व काही मिळते. सर्व सजीवांना जीवंत राहण्यासाठी आवश्यक असणारी बाब म्हणजे ऑक्सीजन.

वृक्ष कार्बन डायॉक्साईड वायु शोषूण घेतात व आपल्याला आवश्यक असणारा ऑक्सिजन ते सोडतात. तसेच वृक्षापासून आपणास अन्नधान्य, भाजीपाला, फळे, औषधी, इंधन, इमारती, लाकूड आदी प्राप्त होते. भूमी आणि जल संरक्षणाचे काम वृक्ष करतात. पाण्याच्या दुष्काळ पूर नियंत्रण, जमिनीची धूप या गोष्टी रोखण्यासाठी जमिनी या ओलसर पण टिकून राहण्यासाठी वृक्षाचा उपयोग होतो. हिमालयाच्या पर्वतीय भागात देवदार बाबू वृक्षांपासून आपल्याला इमारती, जहाजे इत्यादीसाठी लाकूड मिळते. तसेच निसर्गाचा समतोल ही राखला जातो. औषधे तयार करण्यासाठी वृक्षाची फुले, फळे, साल, पाने, मुळे, बिया या सर्वांचा उपयोग केला जातो. स्वादिष्टफळे, सुगंधित फुले, वस्त्र, इंधन, घर यासाठी मानव आजही वृक्षावरच अवलंबून आहे. वृक्ष व पशुपक्षी हे परस्पर पर्यायी आहेत. तिथे वृक्षाची हिरवीगार सावली महत्त्वाचं काम करते. अनेक पशु पक्षी तसेच छोट्या छोट्या जीवांसाठी वृक्ष अतिशय महत्वाचे काम करते. अनेक पक्षी वृक्षावर घरटे बनवितात.
तसेच मनाचा थकवा घालवण्यासाठी पर्यटन सहलीचे आयोजन केले जाते. सांगून जाणारे आपले वृक्षवल्ली सोयरे आहेत त्याचे संरक्षण करणे आपले आद्य कर्तव्य आहे. उलट आता स्वतः चे घर उजाडले आहे म्हणून वृक्षाचे उपकार जाणवत नाहीत म्हणूनही शकत नाही. झाड ही संतां प्रमाणे असतात ती कुणाला काही बोलत नाहीत व स्वतःकडे जे काही आहे ते सर्व इतरांना देण्याचा प्रयत्न करतात. कोणी त्याला तोडायला हवे की जर आपण झाडं तोडली तर आपण स्वतः ची नव्हे तर इतर प्राणी पक्षी पक्षांची व संपूर्ण निसर्गाची हानी करीत आहोत. जर माणसाने आपली वृक्षतोड थांबवली नाही तर लवकरच या सुजलाम सुफलाम धरतीचा नाश होईल आणि सर्वांनी मनापासून झाडे लावा झाडे जगवा हा प्रकल्प हाती घेतला पाहिजे.

मानव आणि निसर्ग याचा संबंध हा प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. निसर्गातूनच माणसाचा जन्म झाला आणि याच निसर्गातून आमच्या सर्व गरजा पूर्ण होतात.निसर्गात माणसाला आयुष्य जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींची पूर्तता होऊ लागली त्यामुळे मानवाने जीवन जगणे सोपे झाले. वस्तु निसर्गातील सर्वात

लक्षात येत असेल पण मनातला लोभ त्याला स्वस्थ बसू देत नाही. सुंदर निसर्गाला आता विनाशाची घरघर तर लागणार नाही ना ? मनात शंकेचे काहूर निर्माण होते असे असेल तर लोभी माणूसच निसर्गाच्या घरघरीला कारणीभूत आहेत.

प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे. रोप लावण्याबरोबर ती कशी जपतील याची खबरदारी घेतली पाहिजे. संगोपन केले पाहिजे. नाहीतर वन महोत्सव साजरे करायचे. मोठमोठ्या मंत्र्यांना आमदारांना आमंत्रित करावी, त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करायचं, झाडे लावा झाडे जगवा भूमीत या जगवा घोषवाक्यांच्या पुकारा करायचा. वर्तमानपत्रात ठळक बातम्यांसह छायाचित्र प्रसिद्ध करायची आणि पुढच्या वर्षी जैसे थे, स्थिती याला काय अर्थ आहे ?

भविष्यात वृक्ष टिकले नाही तर आपणही टिकणार नाही. मुलांप्रमाणे झाडाचीही काळजी घेणे गरजेचे आहे. निसर्गाबरोबर राहण्यासाठी वृक्ष लागवड ही सुवर्णसंधी आहे. वृक्ष माणसाचे जीवन फुलांनी सुगंधित करून फळांनी प्रसवरित करतात. पण मानव वृक्षतोड करून आपल्याच पायावर कुऱ्हाड मारुन घेतात. त्यामुळे वृक्षारोपण ही नितांत गरज ठरली आहे. आपण जीवन, आनंदमय, चैतन्यमय होण्यासाठी झाडे वाचवा. असे प्रयत्न केले तर पदराआड दिवा जपल्याप्रमाणे सृष्टी आपल्यावर मायेचे छत्र सदैव ठेवील. आम्हा सर्वांवर तिची असीम कृपादृष्टी राहील.

निसर्ग आपल्याला शिकवतो पण आपण समजून घेत नाही. निसर्गाशी मैत्री करणे हितावह आहे. निसर्गाची ताकद अफाट आहे. निसर्गाशी शत्रुत्व केले तर तो त्याची ताकद दाखवतो कुठेतरी, सुनामी येते भूकंप होतात व सर्व उद्ध्वस्त होतं व होत्याचे नव्हतं होतं. निसर्ग कोपला असं म्हणण्यापेक्षा त्याला आपण किती कारणीभूत आहोत याचा प्रामुख्याने अंतर्मुख होऊन विचार करणे शहाणपणाचे ठरेल. खरोखरच आज अशी वेळ आली आहे की माणसाने आत्मपरीक्षण करणे अनिवार्य आहे आपण सगळे...

झाडे लावू पाणी घालू ,<br>
वृक्ष संवर्धन करू,<br>
निसर्ग रंगात मिसळून,<br>
पर्यावरण समतोल साधू ,<br>
वृक्षवल्लींना साथ देऊ,<br>
हरित क्रांतीचे गीत गाऊ,<br>
निसर्गात नंदनवन फुलवू,<br>
जगण्याचा आनंद मिळवू,



**श्रेया मच्छिंद्र चौधरी**
**बी.ए. भाग - 2**

# वृक्षसंवर्धन

निसर्ग आपल्याला भरभरून देतो. माणूस त्यांच्या अंगा खांद्यावर जगतो आहे. निसर्ग आपला गुरु आहे. तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतो. आज हा माणूस आपल्या उपकार कर्त्यावर उलटला आहे. मनमोही पावसाने निसर्गासारखे माझ्या अंतर्मनाला मोहविले आहे. झिमझिमनाऱ्या पावसात सृष्टीचे सुजलाम सुफलाम रूप न्याहाळतांना नकळत तुकाराम महाराजांचे भावमधुर काव्य आणि स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या सुरेल स्वरांचा सांज लाभलेला कर्ण मधुर गीताने टवकारले.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे |
पक्षीही सुस्वारे आळवीती ||

वृक्ष आणि वेली ही निसर्गाची सर्वोत्तम वरदान. संथपणे एका लईत बसणाऱ्या पावसाच्या सरींनी भरलेल्या सृजनशील निसर्गाच्या सानिध्यात सृष्टीत दकश्राव्य अनुभव घेता यावा यासारखे भाग्य ते कोणते. मनातील आठवणींची पिसे भिरभिरू लागली धरतीमातेने मुक्त हस्ते बहार केलेला मौल्यवान खजिना म्हणजे वृक्ष आणि वेली. 'परोकाराय फलान्ते वृक्षा' या शब्दात वृक्षांच्या गौरव केला आहे. निसर्ग आणि मानव यांच्यातील स्नेहसंबंध फार पुरातन काळापासून आहे. अगदी अनादी काळापासून निसर्ग मानवाचा मित्र आहे. वृक्ष ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे. अलीकडे पर्यावरण प्रदूषणाविषयी बरेच काही वर्तमानपत्रातून वाचायला मिळते. व्यवसायाचे दुष्परिणाम आता सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवु लागले आहेत. आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्या पृथ्वीचा मानवाने सुरू केलेल्या जंगलतोडीमुळे पृथ्वीचा समतोल बिघडत चाललेला आहे.

निसर्ग आपल्याला भरभरून देतो. माणूस त्यांच्या अंगा खांद्यावर जगतो आहे. निसर्ग आपला गुरु आहे. तो सन्मार्ग दाखवतो. पण लक्षात कोण घेतो. आज हाच माणूस आपल्या उपकार करतांवर उलटला आहे. माणसाने निसर्गाला विद्रुप करायचं जणू पंगच बांधला आहे. एकेकाळी वैभवशाली असलेल्या निसर्गाला अवकळा येत चालली आहे. मानवी मन हे निसर्ग दत्त आहे. आजच्या या यंत्रयुगीन युगात तो यंत्राच्या जंजाळात तेवढाच अधिक अडकतो. तेवढेच त्याचे मन निसर्गाकडे खेचले जाते. म्हणून तर डेरेदार वृक्षांच्या सानिध्यात त्यांचे मन सुखावते निसर्गाच्या ओढीने मन त्यांचे आसुसते. आज प्रमाणाबाहेर जंगलतोड होत आहेत. प्रदूषण अवर्षण, जमिनीची धूप या संकटांना आपणच आमंत्रण देत आहो. निसर्गाचे संतुलन बिघडण्यास कोण जबाबदार याचा सखोल विचार होतो का ? दिसेल त्या झाडावर घाव घालायचे आणि मिळणाऱ्या जागेत घरे, कारखाने उभारायची हे काम माणसांनी सुरू केलं. पैसा कमावणे हे आजच्या युगाचे एक मात्र ध्येय आहे. पैशाच्या मागे लागत असताना आपण ज्या झाडाच्या आश्रयाला आहोत त्या झाडावर आघात करून आपला सर्वनाश करून घेत आहोत. हे माणसाच्या

याच वृक्षवल्लीच्या सनिध्यात नित्य विहार करीत आपल्या ऋषिमुनींनी वेद रचले.

भारतीय संस्कृतीची भक्कम बैठक आम्हाला दिली, हे सारे आपण विसरलो आहोत. धरतीवरील वृक्ष हे पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक आहे. विविध प्रकारच्या वृक्षांमुळे निसर्गाचे सौंदर्य फुलून दिसते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात वृक्षाचे महत्त्व आहे. वृक्ष हे मानवाचे मित्र आहेत. आपल्या सर्वांसाठी वृक्ष हे खूप उपयुक्त असतात. वृक्षापासून आपल्याला खूप फायदा होतो. वृक्षापासून मानवाला शुद्ध हवा मिळत असते. तसेच त्यांच्यापासून फळे, फुले, भोजन आणि इंधन प्राप्त होते. तसेच वृक्ष हे सर्व सजीवांना आणि मानवाला जीवन जगण्यासाठीच आहे.

**प्रगती अशोक जाधव**
**बी.ए. भाग - 2**

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

वृक्ष-झाडे आपणास ऑक्सिजन देतात. ऑक्सिजन ज्याच्याशिवाय आपण काही मिनिटांपेक्षा जास्त जगू शकत नाही. वृक्ष आपल्याला सावली देतात. पशु-पक्षी या सावलीत रखरखत्या सूर्यापासून आसरा घेतात. वृक्षांची मुळे जमिनीची धुप रोखतात. ज्याने चांगली पिके येण्यास मदत होते. विविध प्रकारचे वृक्ष, झाडे, झुडपे, वनस्पती, पीके आपल्याला अन्य-धान्य फळे-भाज्या देतात औषधी वनस्पती कंदमुळे यामुळे बऱ्याच रोगांवर उपाय होतो. घरासाठी लागणारे लाकूड सुद्धा या वृक्षापासून आपणास मिळते. ही झाडे आपल्याला रबर सुद्धा देतात. ज्याने टायर बनवले जाते. दळणवळण होते, व्यवहार वाढतो. हीच झाडे आपणास घर, दुकाने, बांधायला लाकूड देतात. वृक्ष मानवी जीवन चक्राचा एक अविभाज्य घटक आहे.

आपण मात्र या उपकाराची परतफेड कशी करतो वृक्षतोड करून, प्रदूषण करून पिकांवर विषारी फवारे मारून, रानामध्ये वनवे लावून आपल्या पालनकर्त्या निसर्गाचा प्रहार करून किती क्रूर आणि बद्ध झालयं. आपण आपल्या हातानेच आपल्या अस्तित्वाचा विनाश करीत आहोत. आता ही वृक्षतोड एवढी सामान्य झाली आहे की आपणास याबद्दल काहीच वाटत नाही. आपण असे वागत आहोत की काही घडतं नाहीये आपली ही वागणूक एक दिवशी आपल्याला खूप मोठ्या संकटात पाडणार आहे आणि त्याची सुरुवातही झालेली आहे. आपण पाहतो आजकाल दुष्काळ खूप पडतो. पाण्याची टंचाई जाणवते, पृथ्वीचे तापमान वाढत आहे. समुद्राची पातळी वाढत आहे. निसर्ग देत असलेल्या या सर्व चेतावण्यांकडे आपण दुर्लक्ष करत आहोत. जर निसर्गाचा जंगलाचा असाच ऱ्हास होत राहिला तर तो दिवस दूर नाही, जिथे मानवाचे पशुपक्ष्यांचे जगणे अशक्य होईल. जंगले आणि अगदी कीटक सुद्धा मानवी जीवन चक्राचा भाग आहे. आपण हे अगदी सहावी सातवीच्या पुस्तकात शिकलो आहोत. हे सत्य समजून घेणे अवकाश विज्ञानासारखे कठीणही नाही, वृक्षतोड केली, जंगले जाळली हे तर हे जीवनचक्र तुटू शकते आणि याचा परिणाम सर्व सजीवांना आणि मानवाला ही भोगावा लागेल.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हे संसारात राहूनही विरक्त जीवन जगणाऱ्या तुकाराम महाराजांचे बोल आहेत. आपल्यासारख्या चालत्या बोलत्या माणसापेक्षा गावाबाहेरच्या जंगलातील वृक्षवेली त्यांना आपल्याशा वाटतात. मानवी जगातील क्रोध, लोभ, मदमोह, मत्सर अशा विकारांपासून दूर असणारी ही वृक्षवेली. तुकारामांना जास्त आवडतात. कारण त्यांच्या सहवासातच या महान भक्ताला आपल्या मनाशी संवाद साधता येतो. मानव आणि ही वनस्पती सृष्टी ही एकाच विधात्याची लेकरे पण आज माणुस निसर्गापासुन दुर गेला आहे. स्वतः केलेल्या प्रगतीमुळे त्यांच्यातील अहंकार वाढला आहे. मला काहीही अशक्य नाही असे तो समजतो. निसर्गामध्ये आपण वाढलो आजचा मानव विसरला आहे.

वायू - ध्वनी प्रदूषण या सर्व गोष्टीमुळे पर्यावरणाचे बेसुमार नुकसान होत आहे. जनसृष्टीच्या दृष्टीने जीवन रक्षण कवच असलेले "ओझोन वायूचा" थर कमजोर होणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणं होय. पर्यावरणाचा असमतोल झाल्याने अवकाळी पाऊस, चक्रीवादळ, अतिवृष्टी, अति उष्ण तापमान, ऋतुमानात होणारे बदल, भूकंपाचे हादरे येणे या समस्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे हे सर्व थांबवण्यासाठी प्रत्येक सुज्ञाण नागरिकाने सरकारला जल - वायू प्रदूषण रोखण्यासाठी स्वयंस्फूर्तीने हातभरासाठी हिरीरिने पुढे यावे असे आवाहन करण्यात येते.

वृक्षारोपण मोहिमेत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून तन-मन-धनाने भाग घ्यावा ' एक मूल एक झाड ' लावून त्याची निगा राखण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने कडक कायदे करून जंगलामधील वृक्षतोड कुठल्याही परिस्थितीत रोखली पाहिजे. इतकेच नव्हे तर जंगलाच्या संवर्धनासाठी वन्य प्राण्यांचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. वाघ हा खरा जंगलाचा राजा असल्याने त्याची संख्या कशी वाढेल या दृष्टीने वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात. जल प्रदूषण थांबवण्यासाठी औद्योगिक आस्थापनांद्वारे सोडले जाणारे केमिकल युक्त पाणी नद्या खाड्या समुद्राच्या पाण्यात मिसळणार नाही यासाठी राज्याचा उद्योग विभाग आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळांनी कठोर निर्बंध लादावेत. जेणेकरून जल प्रदूषणांस आळा बसू शकेल. आपणही जगा आणि इतरांनाही जगू द्या. हे ध्येय उराशी बाळगून नागरिकांनी आपले जीवन मार्गक्रमित करावे म्हणजे पर्यावरणाचे संवर्धन होऊन वसुंधरा बचाव लोकचळवळ यशस्वी होऊ शकेल..

**कु. अर्चना महादेव शेंडगे**
**बी.ए.भाग 3**



# पर्यावरण संवर्धन काळाची गरज

**निसर्ग माझा मित्र !**

**निसर्ग माझा गुरु !**

**निसर्ग माझी माया !**

**मी त्याचे लेकरू...!**

आजच्या या विज्ञान युगात माणूस जेवढा इंटरनेटच्या जाळ्यात अडकत चालला आहे, तेवढा तो निसर्गाकडेही आकर्षित होतो. म्हणूनच या धकाधकीच्या जीवनातही माणूस दोन दिवस का होईना वेळ काढून निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवितो. तर पर्यावरण म्हणजे काय हो ? पर्यावरण म्हणजे आपण आपल्या भोवतालचा परिसर ज्यात सर्व सजीव व निर्जीव वस्तूंचा समावेश होतो. झाडे तर पर्यावरणाचा आत्मा आहे.

जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. यास्तव वसुंधरेचे देणं फेडण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी तुमची आमची सर्वांची आहे. निसर्ग हे मानव, वन्यजीव, जलचर प्राणी, पक्षी, वनसंपत्ती यांना लाभलेलं मोठं वरदान आहे. या पार्श्वभूमीवर नैसर्गिक संवर्धन करण्यासाठी आधी आपल्या पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे. कारण पर्यावरणाचा समतोल बिघडणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणे होय. सध्याच्या काळात जल, वायू व ध्वनी प्रदूषणामुळे वसुंधरेचं स्वास्थ्य बिघडत चालले आहे. कारण प्रदूषणामुळे पर्यावरणाचे नुकसान होत असल्याची जाणीव नसणं हे बौद्धिक मागासलेपणाचे लक्षण आहेत. पर्यावरणाच्या संवर्धनातून वसुंधरेचा बचाव करण्यासाठी जागतिक पातळी सह विशेष स्तरावर पर्यावरणवादी चळवळीची व्याप्ती वाढीस लागणे ही दिलासा देणारी गोष्ट आहे. पुढे जाऊन ती लोक चळवळ झाली तर ते सर्व घटकांच्या दृष्टीने अधिक लाभदायक ठरेल. हे निश्चित पृथ्वीवरील मानव जातीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन व्हावे. तसेच जल, अणु, वायू प्रदूषण थांबावे या उद्देशाने 05 जून 1972 रोजी स्वीडन मधील स्टॉक होम येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत 250 देशांनी हजेरी लावली होती. त्यातून पर्यावरण हा विषय सर्वदूर शालेय जीवनापासून अभ्यासक्रमात सामील करण्यात आला. हे पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी टाकलेलं पहिलं पाऊल आहे. वैश्विक स्तरावर 5 जून हा दिवस 1974 सालापासून जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा होऊन लागला आहे.

"ओन्ली वन अर्थ" या घोषवाक्याने पहिला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला गेला. तेव्हापासून पर्यावरण समस्यांवर जागतिक पातळीवर ठोस उपाय शोधले जात आहेत. तथापि बदलती जीवनशैली, वाढणारे शहरीकरण, त्यातून होणारी प्रचंड वृक्षतोड, पाण्याचा अमर्याद, वापर बांधकामासाठी टेकड्या पर्वताच्या खोदकाम, नद्या, खाड्या मधून होणारे रेती उत्खनन, जल, वायू प्रदूषण, अणुचाचण्या, वाढत्या वाहनांमुळे होणारे

# पर्यावरण संरक्षण

पर्यावरण म्हणजे सर्व सजीवांच्या जीवनावर परिणाम करणारी भोवतालची परिस्थिती निसर्गही ईश्वराने निर्माण केलेली अद्‌भुत गोष्ट आहे. या निसर्गामध्ये निसर्ग स्वतःच अस्तित्वात असलेल्या घटकांचा वापर आपण व इतर सजीव आपल्या पालनपोषणाकरिता वापर करीत असतात. पृथ्वीवर असणाऱ्या सर्व घटकांचा मानवी जीवनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या परिणाम होतो. मानवाने आपले जीवन समृद्ध करण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनांचा वापर करून आपले जीवन समृद्ध करण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणात अनेक बदल केले.

वाहतुकीसाठी रस्ते, राहण्यासाठी घरे, शेती करणे अशा अनेक घटकांची निर्मिती केली व करीत असून या सर्व घटकांचा परिणाम पर्यावरणावर होताना दिसतोय पर्यावरणाचा दिवसेंदिवस होत जाणारा ऱ्हास व त्याचे सजीव व मानवी जीवनावर होणारे परिणाम आज आपल्याला अनुभवायला मिळतात. आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता ही पूर्णपणे पर्यावरणातून निसर्गातून होत असते. हे आपल्याला माहिती असून सुद्धा पर्यावरण संवर्धनाकरिता आपल्याकडून कोणतेच प्रयत्न होताना दिसत नाही.

उलट पर्यावरणामध्ये उपलब्ध घटकांचा वापर आपण हव्यासापोटी करीत आहोत. मानवाच्या या स्वार्थी वृत्तीमुळे पर्यावरणाचे संतुलन मोठ्या प्रमाणावर बिघत चालले असून त्याबाबत वेळेत जागरूक न झाल्यास येणाऱ्या काळात गंभीर समस्यांना समोर जावे लागेल.यामध्ये कोणते दुमत नाही पर्यावरणामध्ये उपलब्ध असलेल्या घटकांचा वापर मानवाने आपल्याबरोबर इतर सजीव घटकांचा विचार करून केल्यास पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही व भविष्यात येणाऱ्या पर्यावरणीय समस्यांना सामोरे जावे लागणार नाही, परंतु सद्यास्थिती लक्षात घेता पर्यावरणीय समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हानी होताना दिसत आहेत. पर्यावरणातील प्रत्येक सजीव घटकांचे संवर्धन करणे ही आपली एक सामाजिक जबाबदारी आहे. हे विसरून चालणार नाही पर्यावरण सामाजिक संस्थांमध्ये सहभागी होऊन आपले कर्तव्य पार पाडल्यास पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होईल.

मानव इतर सजीवांपेक्षा बुद्धिमान असला तरी तो सुद्धा पर्यावरणाचा एक घटक आहे हे विसरता कामा नये. नैसर्गिक पर्यावरण बदल घडवण्याची क्षमता केवळ मानवाकडे आहे त्याच्या काळजीपूर्वक वापर करणे मानवाचे आद्य कर्तव्य आहे हे आपण ओळखले पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण म्हणून प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करावे व इतरांनाही प्रोत्साहित करावे. पर्यावरण वाचवा ! जीवन वाचवा ! देश वाचवा ! या उक्तीप्रमाणे पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज झाली आहे.



**प्राची अनिल गवई**
**बी.ए. भाग – ३**

# मराठी विभाग

लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म , पंथ , जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

**सुरेश भट**




स्थानिक तक्रार निवारण समिती तर्फे दामिनी पथकाकडून समुपदेशन

गृहअर्थशास्त्र विभागा तर्फे नाविन्यपूर्ण मोदक स्पर्धा





चेतन महादेव कळसकर याला फायरिंग मध्ये मेडल व प्रशस्तीपत्र मिळाल्याबाबत त्याचा सत्कार करताना 13 महाराष्ट्र बटालियन यांचे सीओ

आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त अतिथी व्याख्यान







रा.से.यो. तर्फे वृक्षारोपण करतांना प्राचार्य डॉ.संजय पाटील, डॉ. नीलिमा देशमुख व इतर

गृहअर्थशास्त्र विभागातर्फे आधुनिक जीवनशैलीत आहार आणि पोषणाची गरज यावर मार्गदर्शन





स्पर्धा परीक्षेचे
मार्गदर्शन करताना
अप्पर सहाय्यक
पोलीस अधिक्षक
मा. अशोक थोरात



प्रज्ञाचक्षू
संत गुलाबराव महाराज
व्याख्यानमाला
प्रमुख वक्ते
सुदाम देशमुख
आणि
प्र. कुलगुरु महेंद्र ढोरे




युवा महोत्सवामध्ये
मुकनाट्य
सादर करतांना
विद्यार्थी

बी.व्होक हा व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम देखील महाविद्यालयामध्ये ऑटोमोबाईल आणि व्हेईकल टेस्टिंग या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात येतो. अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज असा हा विभाग संपूर्ण जिल्हास्तरावरच नव्हे तर विद्यापीठ स्तरावर देखील लौकिकपात्र आहे.

**डॉ.संजय पाटील**
**प्राचार्य**

माध्यमातून इंग्रजी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात येऊन यामध्ये देखील अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाच्या माध्यमातून वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये सामूहिक वाचन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे अध्यक्ष प्रसिद्ध लेखक प्रा. मधुकर वडोदे हे होते .यावर्षी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विभागाचे माध्यमातून बि.लीब. अँड इन्फॉर्मेशन सायन्स या वर्गातून हर्षा खंडागळे या विद्यार्थिनीने विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये तृतीय क्रमांक पटकाविला. ग्रंथालयामध्ये एकूण 6215 ग्रंथ, 13 नियतकालिके व जर्नलस, एक लाखाच्यावर ई-बुक्स ,55 कात्रण प्रकल्प ,127 एम.लीब. प्रकल्प, 25 बॅक व्हॉल्युम, अभ्यासक्रम ,प्रश्नपत्रिका इत्यादी अभ्यास साहित्याने महाविद्यालयाचे ग्रंथालय हे सुसज्ज आहे. ग्रंथालयामध्ये एन लिस्ट हे सॉफ्टवेअर देखील उपलब्ध आहे. या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांना विविध ग्रंथांचे वाचन ऑनलाइन पद्धतीने शक्य होते.

शारीरिक शिक्षण विभागाच्या माध्यमातून यावर्षी महाविद्यालयामध्ये मुलांची आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा विद्यापीठ पातळीवर राबविण्यात आली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परिक्षेत्रामधील विविध महाविद्यालयातील कबड्डी चमूंनी यामध्ये सहभाग नोंदविला तसेच खामगाव तालुक्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी देखील कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते . दरवर्षी या विभागाद्वारे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता चाचणी देखील घेतली जाते.सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये देखील विद्यापीठ स्तरावर आयोजित होणाऱ्या युथ फेस्टिवल मध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता.

महाविद्यालयाचे नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे स्मृती आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा राबविण्यात येते. यामध्ये विविध महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला होता. महाविद्यालयाचा दुसरा उपक्रम म्हणजे राज्यस्तरीय वैखरी पुरस्कार .यामध्ये कविता, कादंबरी आणि संकीर्ण विभागामधून श्रीमती स्व. शालिनी गो. देशमुख स्मृती पुरस्कार, प्राचार्य स्व.गो.पु. देशमुख स्मृती पुरस्कार, सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे स्मृती पुरस्कार आणि साहित्याच्या क्षेत्रामध्ये ज्यांनी भरीव कार्य केलेले आहे अशा लेखकांसाठी जीवन गौरव पुरस्कार हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृती जीवनगौरव पुरस्कार म्हणून प्रदान करण्यात येतो. यावर्षी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मृती जीवनगौरव पुरस्कार हा श्री बाबासाहेब भांड यांना तर प्राचार्य स्व.गो.पु. देशमुख स्मृती पुरस्कार हा श्री प्रवीण पवार यांना, श्रीमती स्व. शालिनी गो. देशमुख स्मृती पुरस्कार हा प्रा.डॉ. अनंता सूर यांना, सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे स्मृती पुरस्कार हा श्री. गंगाधर गायकवाड तर स्व. डॉ. विशाल इंगोले स्मृती पुरस्कार हा डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांना यावर्षी देण्यात आला.

# वार्षिक अहवाल

प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा अभिक्रम प्रक्रिया कार्यक्रमाने सत्राची सुरुवात झाली. विविध विभागांद्वारे विद्यार्थीभिमुख आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन या सत्रामध्ये करण्यात आलेले होते .

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जागतिक योग दिवस श्री मुलांडे सरांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला . विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शन प्रा श्रीकांत बेलसरे यांनी केले. तसेच प्लास्टिक मुक्ती अभियान (पालखी मार्ग ),मतदार नोंदणी मार्गदर्शन, हर घर तिरंगा अभियान, श्रमदान, वृक्षारोपण आणि वितरण, एक पेड मा के नाम, स्वच्छता अभियान, महापरिनिर्वाण दिन, सावित्रीबाई जयंती ,रस्ता सुरक्षा अभियान इत्यादी उपक्रम राबविण्यात आले .

राज्यशास्त्र विभागामार्फत अभ्यास मंडळाची स्थापना करून या माध्यमातून विविध अभ्यास पूरक आणि इतर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आले. 'महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024' हा विषय घेऊन एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते . नागपूर, अमरावती तसेच गोंडवाना विद्यापीठातील प्राध्यापकांनी या परिषदेला हजेरी लावून विचार मंथन केले. शिक्षक दिनाचे आयोजन देखील राज्यशास्त्र विभागाच्या माध्यमातून करण्यात आले होते.

समाजशास्त्र विभागाच्या अंतर्गत अभ्यास मंडळाची स्थापना करून वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये सेमिनार आणि विविध अभ्यासपूरक कार्यक्रमांचा समावेश होता. इतिहास विभागाच्या वतीने सेमिनार आणि श्री. खोमणे सर पिंपळगाव राजा यांच्या मार्गदर्शनाखाली नाणे प्रदर्शनी आणि त्या संदर्भात मार्गदर्शन घेण्यात आले .

गृहअर्थशास्त्र विभागाच्या माध्यमातून स्त्रियांचे आरोग्य व गृह व्यवस्थापन, पोशाख व आहारविषयक विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्येच पोषण मास हा रांगोळी व पोस्टर्स स्पर्धा आणि विविध कार्यक्रमांच्या आयोजनामधून साजरा करण्यात आला.


मराठी विभागाद्वारे मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करून वर्षभर विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम राबविण्यात आले होते. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा या राबविण्यात आल्या. इंग्रजी विभागाच्या

# संपादक मंडळ




प्रा.डॉ. हर्षा ढाले

मुख्य संपादक



प्रा.डॉ. मनोहर वासनिक

सहसंपादक



कु. अर्चना शेंडगे

(बी.ए.भाग 3)



कु.सलोनी सदार

(बी.ए. भाग 2)



कु. श्रेया चौधरी

(बी.ए.भाग 2)



कु.प्रांजली माकोडे

(बी.ए.भाग 1)

# अंतरंग


| अनु.क्र. | लेख/कविता | पा.क्र. |
|---|---|---|
| 1 | वार्षिक अहवाल | 9-11 |
| 2 | मराठी विभाग | 15 |
| 3 | पर्यावरण संरक्षण | 16 |
| 4 | पर्यावरण संवर्धन काळाची गरज | 17-18 |
| 5 | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | 19-20 |
| 6 | वृक्षसंवर्धन | 21-22 |
| 7 | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | 23-24 |
| 8 | वृक्ष संवर्धन काळाची गरज | 25-26 |
| 9 | वृक्ष संवर्धन काळाची गरज | 27-29 |
| 10 | वृक्ष संवर्धन काळाची गरज | 30-31 |
| 11 | पर्यावरण संवर्धन काळाची गरज | 32-34 |
| 12 | जंगलतोड वनाचा ऱ्हास | 35-36 |
| 13 | वृक्ष आपले मित्र | 37 |
| 14 | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | 38 |
| 15 | Department Of English | 43 |
| 16 | Annual Report of English Study ... | 44 |
| 17 | Environmental Issues and its ... | 45-47 |
| 18 | Different Day | 48 |
| 19 | My Passionate Nature | 49 |
| 20 | Our Planet, Our Responsibility | 50-51 |

| अनु.क्र. | लेख/कविता | पा.क्र. |
|---|---|---|
| 21 | Water Conservation | 52 |
| 22 | Tree and Water – Nature's Heartbeat | 53 |
| 23 | Situation of Our Environment: ... | 54-57 |
| 24 | मराठी विभाग अहवाल - वाङ्मय अभ्यास ... | 58 |
| 25 | इतिहास विभाग अहवाल | 59 |
| 26 | राज्यशास्त्र विभाग अहवाल | 60-61 |
| 27 | समाजशास्त्र विभाग अहवाल | 62-63 |
| 28 | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग ... | 64-65 |
| 29 | ग्रंथालय विभाग अहवाल | 66-67 |
| 30 | गृहअर्थशास्त्र विभाग अहवाल | 68-69 |
| 31 | राष्ट्रीय सेवा योजना अहवाल 2024 - 25 | 70-71 |
| 32 | सांस्कृतिक विभाग अहवाल | 72 |
| 33 | Report of Vocational Department ... | 73 |
| 34 | राष्ट्रीय छात्र सेना अहवाल | 74 |
| 35 | राष्ट्रीय परिषद अहवाल | 75 |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# संपादकीय




महाविद्यालयीन 'आविष्कार' वार्षिकांक म्हणजे निश्चितच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला-गुणांना वाव देणारा आरसा आहे. आविष्कार 2024-25 च्या अंकात त्याचे प्रतिबिंब निश्चीतच उमटलेले असेल यात शंका नाही. 2024-25 चा अंक वाचकांसमोर सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हा विषय आम्ही प्रस्तुत अंकासाठी ठरविलेला आहे. लेख, कविता, चारोळ्या, चुटकुले असे लेखनाचे स्थूलमानाने वर्गीकरण. प्रस्तुत अंकासाठी संस्थेचे सचिव मा. डॉ.सद्‌गुणराव देशमुख, सहसचिव डॉ. नीलिमा देशमुख यांची प्रेरणा तसेच संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय पाटील यांचे मार्गदर्शन तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.डॉ. हर्षा ढाले**
**मुख्य संपादक**

# प्राचार्यांचे मनोगत



महाविद्यालयाचा 'आविष्कार' विशेषांक आपल्यासमोर सादर करताना खूप आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त लेखन गुणांना वाव देणारा, विकसित करणारा हा महाविद्यालयाचा वार्षिकांक म्हणजे महाविद्यालयाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसाच होय. राष्ट्रीय सेवा योजना, विविध खेळ व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम ,अभ्यास व अभ्यासेतर उपक्रम , विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास यासोबतच संस्थेने राबवलेले विविध वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम या सर्वांचे प्रतिबिंब येथे आपणास दिसेल. निश्चितपणे विद्यार्थ्यांचा सहभाग असलेले हे सर्व उपक्रम महाविद्यालयाच्या उच्चविद्याविभूषित व उत्साही प्राध्यापकांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली पार पडलेले आहेत. विद्यार्थी, शिक्षक यांच्या सुसंवादामुळेच या ठिकाणी साकारलेले महाविद्यालयाचे हे उत्कृष्ट चित्र आपणास दिसते. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सुद्धा या चित्रामध्ये रंग भरलेले आहेत, हे खचितच !

विद्यार्थी, शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सुसंवादी वातावरणामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये आपला सहभाग सतत कायम ठेवावा आणि महाविद्यालयाचे नाव उज्जवल करावे, ही अपेक्षा.

**डॉ. संजय पाटील**

**प्राचार्य,**

**सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे**

**कला महाविद्यालय, खामगांव.**

# सचिवांचे मनोगत



सहकारांच अधिष्ठान असलेले स्व. भास्करराव शिंगणे यांच्या कार्याच्या प्रेरणेतूनच सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे स्मृती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाची स्थापना 1993 साली झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने 2000-2001 मध्ये महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांचं उत्कट रूप म्हणजेच आविष्कार ! या वार्षिकांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक वैचारिक व्यासपीठ निश्चितच मिळालेले आहे.

विद्यार्थी, प्राचार्य, संपादक मंडळ, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी यांच्या परिश्रमातून साकारलेल्या आविष्कार 2024-25 या अंकास तसेच विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस मनः पूर्वक शुभेच्छा..!

**डॉ. सद्गुण देशमुख**

**सचिव,**

**सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे**

**स्मृती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, खामगांव.**

## महाविद्यालयीन प्राध्यापक

- प्रा.डॉ. संजय पाटील - प्राचार्य
- प्रा.डॉ. हर्षा ढाले - मराठी विभाग प्रमुख
- प्रा.डॉ. प्रमोद चव्हाण - इतिहास विभाग प्रमुख
- प्रा.डॉ. नीलिमा देशमुख - इंग्रजी विभाग प्रमुख
- प्रा. डॉ. मनोहर वासनिक - सहयोगी प्राध्यापक (इंग्रजी)
- प्रा.डॉ. दयानंद राऊत - समाजशास्त्र विभाग प्रमुख
- प्रा. डॉ. गणेश विश्वकर्मा - संचालक, शारीरिक शिक्षण विभाग
- प्रा. गोपालकृष्ण राखोंडे - राज्यशास्त्र विभाग प्रमुख
- प्रा. डॉ. मालती सातव - अधिव्याख्याता, गृहअर्थशास्त्र (तासिका तत्वावर)

## ग्रंथालय विभाग

- प्रा. डॉ. संदीप लांडे - ग्रंथपाल
- सचिन पाटील - ग्रंथालय परिचर

## प्रशासकीय विभाग

- प्रा.डॉ. संजय पाटील - प्राचार्य
- विशाल वि. देशमुख - मुख्य लिपीक
- धनंजय श्री. महाले - वरिष्ठ लिपीक
- संदीप सु. देशपांडे - कनिष्ठ लिपीक
- चंद्रसिंग सु.तोमर - शिपाई
- प्रमोद पी. पायस - शिपाई
- आनंद दि. चव्हाण - शिपाई
- सचिन श्री. अवताडे - शिपाई

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

# आविष्कार

२०२४-२५

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| ⊙ मा.ना.डॉ. राजेंद्रजी भास्करराव शिंगणे | अध्यक्ष |
| ⊙ श्री. शंकरराव उत्तमराव जोशी | उपाध्यक्ष |
| ⊙ डॉ. सद्‌गुण गोविंदराव देशमुख | सचिव |
| ⊙ डॉ. नीलिमा दिगांबर देशमुख | सहसचिव |
| ⊙ ॲड. राजेंद्र भाऊसाहेब कोल्हे | कोषाध्यक्ष |
| ⊙ श्री. दिलीप गोविंदराव देशमुख | सदस्य |
| ⊙ सौ. रजनी राजेंद्र शिंगणे | सदस्या |

## संचालित संस्था

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, खामगांव.

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे माध्यमिक विद्यालय व
उच्च माध्यमिक विद्यालय, बोरजवळा, ता. खामगांव.

स्वातंत्र्य सैनिक प्राचार्य स्व.गो. पू. देशमुख मानवसेवा छात्रालय,
बोरजवळा, ता. खामगांव.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगांव

सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव.

# आविष्कार

२०२४–२५

## मुख्य संपादक

प्रा.डॉ. हर्षा ढाले

## सहसंपादक

प्रा.डॉ. मनोहर वासनिक

## संपादक मंडळ

कु. अर्चना शेंडगे (बी.ए.भाग 3)

कु.सलोनी सदार (बी.ए. भाग 2)

कु. श्रेया चौधरी (बी.ए.भाग 2)

कु.प्रांजली माकोडे (बी.ए.भाग 1)

## मुखपृष्ठ व मुद्रण

उन्हाळे ग्राफिक्स, खामगांव

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

## गुणवंत विद्यार्थी



ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाची विद्यार्थीनी हर्षा खंडागळे हिने
संगाबा. अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत 3 रा क्रमांक प्राप्त केला.




आंतर महाविद्यालयीन कबड्डी
स्पर्धेतील रोमांचक सामना




शारीरिक शिक्षण विभागातर्फे आंतर
महाविद्यालयीन क्रीडा (कबड्डी) स्पर्धेचे आयोजन



'वैखरी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार 2025' वितरण कार्यक्रम प्रसंगी डॉ.अनंता सुर, यांचा सपत्नीक सत्कार करतांना प्रसिद्ध साहित्यिक श्रीपाल सबनीस तसेच संस्थेचे सचिव डॉ.सद्‌गुणराव देशमुख, दिलीपराव देशमुख व इतर मान्यवर.



'महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - 2024' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी जर्नल्सचे प्रकाशन करताना मान्यवर




विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेतील विजयी चमुस, फिरतीढाल प्रदान करताना संस्थेच्या सहसचिव डॉ.नीलिमा देशमुख व इतर मान्यवर